कवित्रय मंडळाचा सहकारी प्रातिनिधिक ६ वा काव्यसंग्रह

ग्रं. सं. ठाणें
काव्य
९६०५
१९६५०

६ वी. अंक ६ वा. वर्ष ६ वें. प्रकाशन ६ वें

२४ कवींच्या ६२ कविता

# षष्ठी

REFBK-0011266
REFBK-0011266

गुढी पाडवा) १९६० (शके १८८२

स्थापना १९५४. शके १८७६. मूल्य १२५ पैसे

संपादक :—म. वा. अघोर, साहित्यप्राज्ञ, सोलापूर.

# कवित्रय मंडळ सोलापूर

## "षष्ठी" काव्यसंग्रहाचे मानकरी

| | पृष्टांक |
|---|---|
| षट्चक्रें | २ |
| १ भ. वा. अघोर सोलापूर | ९ |
| २ व. रा. पोतनीस मंगळवेढे | १७ |
| ३ नारायण जगदाळे साहित्यप्राज्ञ टी. डी. सी. पी. अेड्. कसबे तडवळे | १८ |
| ४ सौ. कुंता जगदाळे बी. अे. बी. टी. कसबे तडवळे | २० |
| ५ महादेव भिमाजी कुलकर्णी पुणें | २२ |
| ६ विष्णुसुत अुंब्रजकर अूर्फ रामचद्र विष्णु कुलकर्णी कऱ्हाड | २३ |
| ७ सौ. अुषा खेडकर कुर्डूवाडी | २४ |
| ८ कमलात्मज अूर्फ मेघश्याम नरहर जोशी कोरवली | २५ |
| ९ दिगंबर अनंत देशपांडे फलटण | २७ |
| १० शशिकांत श्रीधर देशपांडे पुणें | २८ |
| ११ रमाकांत आर्ते जामनगर (सौराष्ट्र) | २९ |

१२ सौ. शकुंतला दाते
बी. अे. अलहाबाद (संयुक्त प्रांत) ३४
१३ गोविंद वासुदेव केळकर शहापूर (बेळगाव) ३८
१४ शेष राम कुलकर्णी बी. अे.
कळंब (मराठवाडा) ४१
१५ सौ. कमलाबाअी सोहनी मुंबअी ४४
१६ ना. मा. तिडके कलाकोविद, वेदविद्याविशारद
परळी वैजीनाथ ४६
१७ वासुदेव नरहर सरदेसाअी
बोरसद (गुजराथ) ४८
१८ विश्वासकुमार साहित्यप्राज्ञ नेवासे ५०
१९ डॉ. अनंतराव सरदेसाई म्हारदळ (गोवे) ५४
२० पी. अेन्. कुलकर्णी सोलापूर ५६
२१ वासुदेव कुलकर्णी ठाणा
२२ सदानंद राम शिरोडकर
मातोंड बांबर (रत्नागिरी)
२३ बाळासाहेब नारायण तळवाडकर रावळगाव ५९
२४ वासुदेव बाळाजी भावे धरणगाव (खानदेश) ६०
अभिप्राय ६१
वाङ्मयगंगेचा सादर स्वीकार ६९

REFBK-0011266
REFBK-0011266

# षट्चक्रें

१९५४ सालीं कवित्रय मंडळ स्थापन झालें. १९५५ सालीं आमच्या मंडळाचा सहकारी प्रकाशनाचा 'प्रतिपदा' हा पहिला काव्यसंग्रह निघाला. पुढे प्रत्येक वर्षी क्रमाने 'द्वितीया', 'तृतीया' 'चतुर्थी', 'पंचमी' असे काव्यसंग्रह निघत गेले. सहाव्या वर्षाचा 'षष्ठी' हा काव्यसंग्रह आज प्रसिद्ध होत आहे. असा या 'षष्ठी' काव्यसंग्रहाचा अितिहास आहे. गुढी पाडव्यास हा काव्यसंग्रह प्रसिद्ध करून आमच्या मंडळाने ७ व्या वर्षांत पदार्पण केलें आहे. मंडळातर्फे आत्तापर्यंत ३२ कवींच्या १९४ कविता व २३२ पानें अेवढें वाङमय प्रकाशित झालें.

गेल्यावर्षी गुढी पाडव्यास 'पंचमी' काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. त्या दिवशीं सकाळीं पांडुरंग आश्रमाचे संचालक श्री. पांडुरंग दत्तात्रय घुगरदरे यांनी आपल्या पांडुरंग आश्रमांत कवित्रय मंडळाचें व 'पंचमी' काव्यसंग्रहाचे प्रकाशनाध्यक्ष श्री. ग. गो. परिचारक यांचें फारच अपूर्व स्वागत केलें. सडासंमार्जन करून चोहोकडे पंचरंगी पंचनक्षीची रांगोळी काढून " कवित्रय मंडळाचा विजय असो, कवि भ. वा. अघोर यांचा विजय असो " अशीं पंचरंगी रांगोळयांनी अक्षरें काढून पंचारती ओवाळून सर्वांचें स्वागत केलें. आश्रमांतील भितीनाहि रंग देअून भींतीवर पांच रंगांनी, पांच प्रकारच्या नक्षींनी व पांच पद्धतीनी 'पंचमी' हीं अक्षरें कोरलीं. श्री. घुगरदरे यांनी अध्यक्षांचें गुणवर्णन करून त्यांना पुष्पहार घातला व पुढे ते म्हणाले "कवि भ. वा. अघोर यांनी आज पांच वर्षे कवित्रय मंडळाचें कार्य मोठ्या नेटाने जोमाने व धडाडीने चालविलें आहे. ही गोष्ट मोठी भूषणावह व अत्यंत प्रशंसनीय आहे" नंतर सर्वांना अल्पोपहार

देण्यांत आला. पंचरंगी रांगोळ्या, प्रत्येकापुढें पांच पांच उदबत्या, व अल्पोपहारास पांच पक्वानें. नंतर पांच पानांचा विडा. 'पंचमी' काव्यसंग्रहाचें प्रकाशन असल्यामुळें त्यांनी साऱ्या गोष्टी पंचमय करून टाकल्या. असा त्यांच्या आश्रमातील सकाळचा कार्यक्रम झाला.

दुपारीं ४–२५ ला मंगल वाद्यांच्या मंजुळ स्वरांनी समारंभास सुरवात झाली. अत्तर व गुलाबपाणी यांनी सर्वांचें स्वागत करण्यांत आलें. कविवर्य नृसिंहाग्रज, शं. गो. पटवर्धन, कमलराम, व श्री. घुगरदरे यांचीं काव्यसंग्रहाच्या समालोचनपर भाषणें झालीं. सर्वांनीं कवित्रयमंडळाचें कौतूक करून संग्रहांतील कविता उत्कृष्ट असल्याचें सांगितलें. कविवर्य शं. गो. पटवर्धन यांनी तर काव्यांतच अभिप्राय तयार करून म्हणून दाखविला श्री. घुगरदरे म्हणाले " कवित्रय मंडळाची वाङ्मयगंगा प्रथम सोलापुरांतच होती. श्री. भ. वा. अघोर यांनी भगीरथ प्रयत्न करून ती पांच जिल्ह्यापर्यंत विस्तृत करून अखंड वाहती ठेवली. त्यांच्या या प्रयत्नांचें मी स्वागत करतों " असें म्हणून त्यांनी श्री. अघोर यांना हार घालून व गुच्छ, श्रीफळ देऊन समारंभातच त्यांचा सत्कार केला. अध्यक्ष, अध्यक्षीय भाषणांत म्हणाले " पंचमी काव्यसंग्रह वाचून मी बेहद्द खूष आहे. कवित्रय मंडळाचा उपक्रम स्तुत्य असून या काव्यसंग्रहांतील कविता विविध विषयांवर असून त्या उत्कृष्ट अशाच आहेत. " असें सांगून प्रत्येक कवीच्या काव्यांतील उत्कृष्ट भाग त्यांनी निवेदन केला. आभार प्रदर्शन, रसपान, व पानसुपारीनंतर हा समारंभ विराम पावला.

यावर्षी कवि रमाकांत आर्ते, सौ. शकुंतला दाते, गोविंद वासुदेव केळकर, शे राम कुलकर्णी, सौ. कमलाबाई सोहनी, ना. मा. तिडके, वासुदेव नरहर सरदेसाई, विश्वासकुमार, पी. एन्. कुलकर्णी, वासुदेव कुलकर्णी, सदानंद राम शिरोडकर, बाळासाहेब तळवाडकर, डॉ. अनंतराव सरदेसाई, वासुदेव बाळाजी भावे, हे नवीनच आमच्या मंडळाचे सदस्य झाले. म्हणून आम्ही त्यांचें मन:पूर्वक अभिनंदन व स्वागत करतों. व मंडळाशीं त्यांनी कायमचा ऋणानुबंध ठेवावा अशी आम्ही त्यांना विनंती करतों.

श्री. पांडुरंगराव घुगरदरे यांनी या वर्षी आमच्या मंडळास ६ रुपयांची देणगी दिली. " गेल्यावर्षी 'पंचमी' म्हणून ५ रुपये देणगी मी दिली. यावर्षी 'षष्ठी' म्हणून ६ रुपये देणगी मी देत आहे " असे मोठ्या प्रेमाने ते म्हणाले. त्यांचें हें क्रियाशील प्रोत्साहन खरोखरच अनुपमेय व अनुकरणीय आहे. या गोष्टीकडे रसिक वाचकांचें लक्ष आम्ही वेधूं अिच्छितों. अशी सक्रिय सहानुभूति त्यांनी दाखविल्यांस आम्हांस आमच्या या प्रकाशनासंबंधीच्या अनेक सुधारणा व योजना साकार करतां येतील. देणगीची व देणगीदारांची नांवे संग्रहातून प्रसिद्ध केलीं जातील. व भेट म्हणून काव्यसंग्रह पाठविला जाअील. विष्णू मिलमधील घडी खात्यांतील श्री. महादेव भिमाशंकर मेंगाणे व श्री. तुळजाराम सदाशिव राजे या कामगार बंधूंनी आमच्या प्रकाशनास प्रत्येकीं २ रुपये देणगी दिली. याबद्दल या कामगार बंधूंचें कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे.

या प्रकाशनासंबंधी अेक गोष्ट मला सुचवावीशी वाटतें. " कमी आदा व खर्च जादा " या सूत्रांतून मी हे संग्रह प्रका-

शित करीत आहे. आणि म्हणूनच हें प्रकाशन सातत्याने निघत आहे. अर्थात मंडळांतील कवींचें सहकार्य या गोष्टीस प्रामुख्याने कारणीभून आहे. हे मी विसरूं शकणार नाही. पण आंथरुण पाहून पाय पसरावयाचें ठरविलें असतें तर या स्थितीपर्यंत काव्यसंग्रह आला नसता. हेंहि कोणांस विसरतां येणार नाही. 'प्रतिपदा' संग्रह ३ कवींचा व १६ पानांचा होता. वाढत वाढत हा 'षष्ठी' संग्रह ७४ पानांचा व २४ कवींचा आहे. म्हणजे पृष्टसंख्या चौपट वाढली असून कवींची संख्या ८ पट वाढली आहे कवींची व पृष्टांची संख्या जसजशी वाढत जाईल तसतशे मंडळाचें कामकाज, व्याप व खर्च वाढत चालला आहे. मंडळाची आर्थिक ताकद रुंदावल्याखेरीज आमच्या कांही योजना फलद्रूप होणार नाहीत. अेवढ्यासाठी जनतेचें सहकार्य हवें आहे. आमचें ६ वर्षाचें कार्य सर्वांपुढे आहेच. तरी जनता–जनार्दनाने या गोष्टीचा सहानुभूतिपूर्वक विचार करून आमच्या या प्रत्येक वार्षिक प्रकाशनास मदत म्हणून कार्यालयाकडे देणगी पाठवावी. मंडळातील कवीनीहि लोकांना हें कार्य पटवून देअून सहकार्य मिळवावें अशी विनंती आहे. यावर्षी आमच्या मंडळाचें क्षेत्र बरेच व्यापक झालें असून महाराष्ट्र, सौराष्ट्र, गुजराथ, संयुक्त प्रांत, गोवे, येथपर्यंत तें पसरलें आहे. आमच्या मंडळाचा हा ६ वा सहकारी प्रातिनिधिक काव्यसंग्रह आहे. अजून ४ काव्यसंग्रहानंतर "अेकादशी" हा खास पारमार्थिक व धार्मिक काव्यांचा विशेषांक निघणार आहे. याशिवाय बालवाङ्मय विशेषांक, स्वातंत्र्यदिन विशेषांक, साक्षरता प्रसार विशेषांक, समर्थ विशेषांक, गोकुळ अष्टमी विशेषांक, अशीं कांही खास प्रकाशनें करण्याचा आमचा मानस असून तीं तीं प्रकाशनें त्या त्या दिनविशेषांवरच प्रसिद्ध होणार. जनता–जनार्दनाकडून या विशेष प्रकाशनांसाठी देणग्या मिळाल्यांस हीं प्रकाशनें आम्ही हातीं घेणार आहोंत. नाहीतर आमच्या सवडीप्रमाणे तीं आम्ही करूं.

श्री. घुगरदरे यांच्या पांडुरंग आश्रमांत कवि यशवंतसुत यांच्या समर्थचरित्राचें प्रकाशन झालें. त्यावेळीं श्री. घुगरदरे यांनीं कवित्रय मंडळांचा गौरवपूर्ण उल्लेख केला. दिनकर मंगल कार्यालयांत समर्थजन्मोत्सव मंडळाची सभा भरली, त्या सभेंत अहवाल वाचनांत कवित्रय मंडळ.चा उल्लेख करण्यांत आला. सज्जनगड मासिकांत कवित्रय मंडळानें दासनवमी साजरी केल्याचें वृत्त आलें. मे १९५९ मध्यें मिरज येथे झालेल्या साहित्य संमेलनास कवित्रय मंडळातर्फे शुभ संदेश पाठविण्यांत येऊन संमेलनाध्यक्ष प्रो. क्षीरसागर, प्रदर्शन उद्-घाटक म. म. दत्तो वामन पोतदार यांचा पुष्पहार घालून व मंडळाचे सर्व काव्यसंग्रह भेट म्हणून देऊन त्यांचा सत्कार करण्यांत आला. त्याचप्रमाणे कविवर्य म. भि. कुलकर्णी यांच्या षष्ठ्यद्बि निमित्त याच संमेलनांत त्यांचा सत्कार करण्यांत आला. कवि कमलराम यांच्या 'भावफुलोरा' काव्यसंग्रहाचें श्री. मोरोपंत जोशी अर्वीकर यांच्या अध्यक्षतेखालीं दिनांक ३१।५।५९ ला प्रकाशन झालें. कवित्रय मंडळाची त्यांनी माझ्या जवळ चौकशी केली. मी सर्व माहिती सांगतांच ते खूष झाले. व समाधान व्यक्त करून त्यांनी मंडळास शुभाशिर्वाद दिला. कविवर्य संजीव यांच्या ४५ व्या वाढदिवसानिमित्त दिनांक ७।६।५९ ला कवित्रय मंडळातर्फे त्यांना पुष्पहार घालून व गुच्छ देऊन सत्कार व अभिष्टचिंतन करण्यांत आलें. पी. एन्. कुलकर्णी यांच्या 'भावमंजिऱ्या' काव्यसंग्रह प्रकाशनाच्यावेळीं दि. १६।७।५९ ला मंडळातर्फे शुभ संदेश पाठविण्यांत आला. दि. ३०।७।५९ रोजीं श्री. गुळवणी महाराज यांना मंडळाचे सर्व काव्यसंग्रह देऊह त्यांचा सत्कार करण्यांत आला. त्यांनी मंडळास शुभाशिर्वाद दिला. दि. ७।८।५९ रोजीं श्री. घुगरदरे

यांच्या वाढदिवसानिमित्त पुष्पहार घालून व गुच्छ श्रीफळ देऊन मंडळातर्फे त्यांचा सत्कार व अभिष्टचिंतन करण्यांत आलें.

डिसेंबर ५९ मध्यें तुळजापूर येथे उस्मानाबाद जिल्हा साहित्य संमेलन झालें. त्याप्रसंगीं मंडळातर्फे शुभसंदेश पाठविण्यांत आला. फेब्रुवारी १९६० मध्यें करमाळा येथे सोलापूर जिल्हा साहित्य संमेलन झालें. त्याप्रसंगीं मंडळातर्फे शुभ संदेश पाठविला. व अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना भेट म्हणून मंडळाचे सर्व काव्यसंग्रह पाठविले.

यावर्षी कवि विश्वासकुमार हे 'साहित्यप्राज्ञ' उत्तीर्ण झाले याबद्दल त्यांचें अभिनंदन. कवि नारायण जगदाळे हे साहित्यविशारद, व कवि दि. अ. देशपांडे हे साहित्यप्राज्ञ या परिक्षांस यंदा बसणार आहेत. आम्ही त्यांना सुयश चिंतितों.

कविवर्य मा. गो. काटकर व श्री. वर्तक यांच्या सौजन्यामुळे मंडळाच्या वार्षिक प्रकाशन समारंभास दरवर्षी स्थान मिळतें. याबद्दल मी उभयतांचें आभार मानतों. षष्टी काव्य संग्रहातील सर्व कवींच्या संपूर्ण सहकार्यामुळेंच हा 'षष्टी' काव्यसंग्रह निघाला आहे. तेंव्हा या सर्व कवींचें कितीहि आभार मानलें तरी तें अपुरेंच !

संपादक साप्ताहिक मौज, संपादक साप्ताहिक साधना व संपादक साप्ताहिक वनश्री यांनीं आमच्या 'षष्ठी' काव्य संग्रहाचें प्रसिद्धीकरण केलें याबद्दल या संपादक त्रयांचें आम्हीं ऋणीं आहोंत.

वाढता संघर्ष, कवींची वाढती संख्या, पृष्टांची वाढ, रसिकांचा पत्रव्यवहार व त्यांचें सद्भावना प्रगटन, सप्रेमभेट म्हणून आलेली वाढती वाङमय संपदा व मंडळाचें व्यापक क्षेत्र हीं षष्ठीचीं षट्चक्रें आहेत.

काव्यशास्त्र हा एक योग आहे. योग, मग तो कोणताहि असो, अवघडच असतो. काव्यशास्त्राच्या या योगामध्यें आमच्या मंडळाच्या प्रकाशन रूपी कुंडलिनीने 'प्रतिपदा' ते षष्ठी' अशीं हीं षट्चक्रें ओलांडिलीं आहेत. हीं षट्चक्रें भेदन करून ती पुढे सहस्रदल चक्राकडे निघाली आहे. या सहस्रदल चक्राच्या मध्यभागीं असणाऱ्या चंद्रापर्यंत ती जाणार आहे. चंद्रामृत तळ्यांतील अमृत ही कुंडलिनी, सर्वांना पाजणार आहे. सर्वांचें समाधान करणार आहे. सर्वांची तृप्ती करणार आहे. सर्वांना आनंदित करणार आहे.

प्रोफेसर कविवर्य वैशाख ऊर्फ श्री. त्र्यं. वि. सरदेशमूख एम्. ए. बी. टी. यांनी या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनाचें अध्यक्षपद स्वीकारलें. याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

" शिवाविष्कार " ही कविता मुंबईच्या व पंढरपूरच्या साप्ताहिक हिंदू मध्यें प्रसिद्ध झालेली आहे.

या काव्यसंग्रहांत काव्यशास्त्रांत कांहीं तपें खर्च केलेले असे नामवंत कवि आहेत. माझ्यासारखे नवोदित सामान्य कवि आहेत. व अतिसामान्य असेहि कांही कवि आहेत. हंसक्षीर पद्धतीने आमचा हा प्रयत्न गोड करून घ्यावा, अशी रसिकांस विनंती आहे.

सर्व संपादकांस विनंती की अभिप्रायाचा अंक पाठवावाच. हे शक्य नसल्यास कात्रण तरी पाठवावे. वा कोणत्या अंकांत अभिप्राय आला हे तरी निदान कृपया कळवावें.

**भ. वा. अघोर**
२८-३-६०

**कवित्रय मंडळ कार्यालय**
नरसिंह दरबार सोलापूर.



## षष्ठी

अर्ध तपाची सेवा घडली

''षष्ठी'' म्हणुनी पहा झळकली

कवि–रसिकांच्या सहकार्याने

वाङ्मयगंगा वाहुं लागली

## ⁂ मानव आणि जीवन ⁂

जीवन म्हणजे
काळा काळा
सळसळणारा सर्प आहे
मानव म्हणजे
शुभ्र मऊशी
सर्पाची त्या कात आहे

* *

## गुरुची महती

गुरु हा ब्रह्मा, विष्णू, महेश प्रत्यक्ष, श्रेष्ठ गुरु फार ।
परब्रह्महो साक्षात्, माझा गुरुला असो नमस्कार ॥

# शिवाविष्कार

" अितक्या घाअीमधें आज हो निघालात कोठें ?"
शंकरास पार्वती प्रश्न करि नवल तिला वाटे ॥१॥
" मे आठ्ठाविस, शहात्तरावा जन्मदिवस आज
भारतीय वीराचा अेका, जो ' भरता ' साज ॥२॥
" थाट पहाया चाललो प्रिये " " थांबा मी येतें '
दोघे निघती, पार्वतीस शिव झाले ते वदते ॥३॥
क्रांतिवीर सावरकर यांचें चरित्र अद्भुत तें
मनालागि मृत, संजीवनि, वीरश्री संचरते ॥४॥
ओजस्वी अति तडफदार तें त्यांचें वक्तृत्व
जातिवंत कवि, असामान्य तें त्यांचें कर्तृत्व ॥५॥
अफाट धाडसि साहसि तैशी धैर्यशालि वृत्ती
तेजस्वी देखणी करारी प्रभावि ती मूर्ती ॥६॥
लेखक प्रतिभासंपन्न नि अति सखोल विद्वान
मायबोलिचा मायभूमिचा ज्वलंत अभिमान ॥७॥
क्रांतिवीर अन् देशभक्त अशि त्रिखंडांत कीर्ती
सर्व गुणांची त्यांच्या ठायीं दिसे पहा पूर्ती ॥८॥
देशासाठीं महान शिक्षा, खडतर दुःख अती–
सोशी निधड्या छातीनें, ही अद्वितीय व्यक्ती ॥९॥
" क्रांतिवीर " " स्वातंत्र्यवीर " अन् " वीर " " देशभक्त "
" हिंदुराष्ट्रपति " " हिंदुहृदयसम्राट " अशा रास्त–॥१०॥
पदव्या जनतेने अर्पियल्या खुषिने हर्षांनी
योजियल्या त्या कर्तृत्व नि ते सद्गुण देखूनी ॥११॥
अवतरलों मी प्रिये पहा गे ! मारुतिच्या रूपें
राष्ट्रगुरू श्रीरामदास अन् तैसे शिवभूपें ॥१२॥

तात्यारावांच्या रूपानें माझा सध्याचा
अविष्कार हा नूतन असतो अैक प्रिये साचा'' ॥१३॥
आकाशांतुन बोलत अैसें शिवपार्वति निघती
संभाषणिं ते दोघे अगदी गुंगुनिया जाती ॥१४॥
कडकडाट तो टाळ्यांचा अन् प्रचंड जयकार
झगझगाट अति प्रखर विजेची रोषनाअि फार ॥१५॥
ध्वनी अैकतां शंकर वदती पार्वतिला तेव्हां
'' नगर विनायक '' मुंबअिमधलें असतें हेंच पहा ॥१६॥
अैसें वदुनी तिथुनच शंकर विनायकांवरतीं
कैलासांतिल सुदिव्य सुमनें सहर्ष अुधळीती ॥१७॥

## अशी माणसाची जात आहे !

अशी माणसाची जात आहे
माणसासाठी माणुस मरतो
माणसासाठी माणुस जगतो
माणसासाठी माणुस राबतो
माणसासाठी सर्व गमावतो
अशी माणसाची जात आहे.
अशी माणसाची जात आहे
जीवासाठीं जीव देतो
आपल्या जिवाचें रान करतो
प्राणसाठी प्राण देतो
पैशासाठी प्राण घेतो
अशी माणसाची जात आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 11266
(स्थळ प्रत)

अशी माणसाची जात आहे
लहानाचें केलें ज्यानें मोठें
राखून ठेवलें गाठोडें
अशा त्या माणसाकडे
ढुंकूनसुद्धां पहात नाही
अशी माणसाची जात आहे.

अशी माणसाची जात आहे
घरांत बायकोला नाही चोळी
दुसऱ्या बाईला चारतो पोळी
जरी आली करीं झोळी—
विचार त्याला सुचत नाही
अशी माणसाची जात आहे.

अशी माणसाची जात आहे
ज्याचा कांही संबंध नाही
ज्याचें कांही नातें नाही
त्याशीं नातें जोडूं पाही
स्वकीयांशीं भांडत राही
अशी माणसाची जात आहे.

अशी माणसाची जात आहे
आपल्यासाठी ज्यानें केली
सर्वस्वाची अगदी होळी
त्याच्या गळयांत घालण्या झोळी
मागे पुढे पहात नाही
अशी माणसाची जात आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रम ... दि: ... नों दि: ...

अशी माणसाची जात आहे
माणसाला माणूस ओळखत नाही
पैशापुढे कांही दिसत नांही
लोभ, मत्सर, स्वार्थापुढे–
नातेंगोतें स्मरत नाही
अशी माणसाची जात आहे.

अशी माणसाची जात आहे
ज्याने निर्मिला हा मानव
त्याचा सुद्धा त्याला नाठव !
अितरांची मग कथा काय ?
कोण ? कोठला ? संबंध काय ?
अशी माणसाची जात आहे.

अशी माणसाची जात आहे
देव मानव आणि दानव
पहिला वर्ग नाही दिसत
दुसरा वर्ग आहे घटत
तिसरा वर्ग आहे वाढत
सारे थर्ड क्लास्‌चेच पॅसेंजर
सारे थर्ड क्लास्‌चेच पॅसेंजर
अशी माणसाची जात आहे !

* *

# कोणाला कशाचें !

अलंकार–प्रिय विष्णू, शिवास आवड अखंड जलधार
नमस्कार सूर्याला, भोजन प्रिय ब्राह्मणास हो फार ॥

# 卐 दिवस आणि रात्र 卐

थाटाने पृथ्वी कैलासांवर गेली
शिवदर्शन घ्यावें, लहर अशी तिज आली ॥१॥
ते सांब सदाशिव ध्यानमग्न ती पाही
काढुनी फणा, ध्यानस्थ शेष, शिरिं राही ॥२॥
नानाविध साहित्यांनी पूजा करतां
ती, पुष्पहार शिवकंठीं घालित असतां– ॥३॥
धक्काच लागला शेषाला, तो खवळे
आदळी डंखण्या, फणा सळसळा अुसळे ॥४॥
त्या फणा प्रहारें सावध शंकर झाले
अस्वस्थ होअुनी पृथ्विस अवलोकीलें ॥५॥
ते वदले " देवी ! ध्यानभंग मम केला
मुखचंद्रमा तुझा, होअिल बघ गे काळा ॥६॥
परि माझें केलें पूजन तूं भक्तीने
होअील प्रकाशित मुख तव यायोगाने ॥७॥
समकाल क्रमाने होतिल स्थिति या दोन्ही
अु:शाप अैकुनी परत पातली धरणी ॥८॥
काळोख पाहुनी " रात्र " जाहली म्हणती
देखुनी प्रकाशा " दिवस " असें जन वदती ॥९॥

* *

# सारें दैवाधीन !

मिळतें सारें दैवें, नच विद्या वा पराक्रमानेही
समुद्रमंथनिं लक्ष्मी; विष्णूला, फल शिवा हलाहल ही ॥

# कसें निवळेल अशाने जीवन ?

कुठे कांहीतरी सलत आहे
कुठे कांहीतरी धुमसत आहे
भडका अुडतो केव्हांतरी
अुध्वस्त होतें जीवन सारें
भुरे काळे नाग त्यांतून
फणा काढून फुत्कार करतात
विषयव्याळ भडकत राहतो
' सुमनें ' बिचारीं होरपळतआहेत
त्यांना लागला पहा टी. बी.
कोण त्यांची घेतो काळजी ?
धर्ममार्तंड तळपतो आहे
अूबच त्याची लागत नाही
त्याचा प्रकाश पडत नाही
हवी निळी टयूब् लाअिट्
तुरट वारा झिम्मा खेळतो
खारट जीवन ढवळीत बसतो
कसें निवळेल अशाने जीवन ?

* *

# आमिषाला सारे वश !

देतां मुखिं गोळा तो होअि न वश कोण हो असा असतो ?
निर्जिव मृदंग तोही मुखलेपाने मधूर ध्वनि करतो ।।

# आजचा हिशोब

दगडाचा बनविणें देव
हेंच मानवाचें परम वैशिष्टच
पण...आजचा मानव
देवालाच बनवितो दगड !
देवाला बनविणें दगड–
ही गोष्ट का साधी आहे?
रावणाचा होईल राम
पण रामाचा रावण ?
......पण बिचाऱ्या रामालाच
आज फुटली तोंडें दहा
अेकाचे दहा......
तर पांचाचें शून्य
हा आजचा हिशोब आहे !

* *

# मला ओळखाल कां ?

१) झरा असे मी पुण्याअीचा
महान पापें प्रक्षाळीतों
भवाब्धिचें मी मंथन करुनी
मोक्षामृत तें जनां पाजितों (रामनाम)

२) देश देव अन् मानव, कुणिही
तावडीतुनी माझ्या न सुटे
नांव अैकतां माझें नुसतें
सर्वांनाही धडकी भरते ! (शनि)

—भ. वा. अघोर, साहित्यप्राज्ञ



कवि:–व. रा. पोतनीस

# जीवित नौका

अफाट अैशा विश्वसागरीं ।धृ.।
पिसाट सुटली जीवित–नौका
लपल्या खडका, देअिल धडका
वा आवर्तीं घेअिल गिरका
मी जाअु कसा
मग पैलतिरीं ? ॥ १ ॥

तुफान वादळ दर्या अवखळ
प्रमत्त लाटा करती खळखळ
काळोखाचें दाटें काजळ
काहूर भीतिचें भरें अुरीं ॥२॥

म्हणती " जीवित तर क्षणभंगुर
अथांग दुस्तर हा भवसागर "
नौका त्यांवर होअि खाअिवर
संपलीच मग मुशाफिरी ! ॥३॥

सुटलें वल्हें, झालों अगतिक
जुळले कर, नत नकळत मस्तक
अंतिं अनंता स्मरतों, पाअिक
ने पैलतिरीं वा जलांतरीं ! ॥४॥

–व. रा. पोतनीस



# गुलाबी संगत

तुझी गुलाबी संगत
नित्य पालटवी नूर
विलासांत तूं मी चूर
'जहांगीर' आणि नूर'' !

कवि:-नारायण जगदाळे

# नाही माझ्या मनीं हेवा !

कडू फळें कडू फुलें
कडू माझें रोमरोम
नाही माझ्या मनीं हेवा
जरी दुजापाशीं सोम ॥१॥

माझीं फळें, माझीं फुलें
येतीं आणि वाया जातीं
माधुर्याचे सौंदर्याचे
सारे लोक गुण गाती ॥२॥

माझ्या फळां माझ्या फुलां
नसो रुची नसो वास
घेती त्यांचे सारे लोक
पाडव्यास दोन घास ! ॥३॥

* *

## टिचकी

स्वप्न–सुंदरी
समोर येअुन
हळुच मारते
भाळीं टिचकी;
येअुन जाते
करीत नर्तन
स्वर्लोकीची
धुंद नर्तकी ॥१॥

हात रेशमी
दो नयनांवर
नुपुरांकित पद
चालहि तुरकी;
बोटांच्या त्या
बुरख्यामाजीं
भावहि दिसती
मला नाटकी ॥२॥

पाठ फिरवितां
पाठीं दिसते
अुसवत असतां
तिची कंचुकी;
विचार कांही
मनांत येअुन
नकळत वाजे
क्षणांत चुटकी ॥३॥

नयनामधुनी
चित्त चोरतें
करुनीया ती
जादू लटकी;
पापणिचे कर
दूर सारतां
हुरहुर लावी
मनास टिचकी ॥४॥

—नारायण जगदाळे, साहित्यप्राज्ञ.

# वय वाढतां वाढतां



तुझ्या बोबड्या बोलांना
कधी यावी न कटुता
वाढो मधूरता त्यांची
वय वाढतां वाढतां ॥१॥

निरागस नजरेंत
असो निर्मळ नीलिमा
निरभ्र आकाशासम
स्वच्छ मनाची प्रतिमा ॥२॥

कवयित्री–सौ. कुंता जगदाळे

गोरे हात करतात
माझ्या वक्षांवर चाळा
त्यांच्या करवी न व्हावें
हीन कर्म कधी बाळा ! ॥२॥

तुझी चिमणीं पाउलें
वळावी न आडमार्गा
त्याचें बल काटकता
गाठो तुझ्या ध्येय–स्वर्गा ॥४॥

जगीं अुफराटें होतें
'वाढे तनु, घटें मन'
तुझ्या तनूसवे बाळा !
व्हावें मोठें मोठें मन ! ॥५॥

# भंगणार स्वप्न जर–

ग्रंथालय ठाणे
११२६६
(स्थल प्रत)

अेक गोड गोड स्वप्न
माझ्या मनांत रंगतें
नित्य नूतन रंगाची
छटा त्यांवरीं चढते ॥१॥

त्यांत खळाळत एक
भाव सरिता वहाते
ओढ घेत धावें मन
शुभ्र लहरी सांगातें ॥२॥

धुंदाअून सुखामधें
ओठीं आलें भावगीत
साथ देअूनिया कुणी
रंगविलें माझें गीत ? ॥३॥

नाही राहियलें भान
विसरली वास्तवता
कुणी हिणावून पुसें
"काय होअील सांगता ?" ॥४॥

भंगणार स्वप्न जर
आयु कशाला पुढचें ?
सुख–सागरीं स्वप्नाच्या
भाग्य लाभो बुडायाचें ! ॥५॥

–सौ. कुंता जगदाळे बी. अे. बी. टी.

# चंद्राविण ही आज पौर्णिमा !

कळा तिथींच्या असती शशिला
अंवसेला तर काळें करितो
ग्रहणाने बेजार कधिकधिं
शशलांच्छिततनु सदाच दिसतो

आक्रमणास्तव सिद्ध विधुवरी–
पृथ्वीगोलावरचे मानव
चंद्रलोक आपुलाच म्हणतिल
पदधूलीने करून मळकट

वदनचंद्र तव नसे तयासम
निधि निर्मलीन सौंदर्याचा
प्रफुल्लतेला अधिकचि फुलवित
तृप्त करी मम चित्तचकोरा

नसे परी तूं आज निकट मम
उदास दिसती दहाही दिशा
शरच्चंद्र नभि, परंतु वाटे
चंद्राविण ही आज पौर्णिमा !

—महादेव भिमाजी कुलकर्णी

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
३८८३५ दि: ७/७/८४

# ◀ ग्रामीण प्रवाशी ▶

फेटा मस्तकिं, अष्टिचें अुपरणें, मारोनि काखोटिला
पायीं घालुनि वाहणा झपझपा टाकीतसे पावलां
भासे हा दमला, परंतु पळही घेअी न विश्रांतिला
जाअी चालत अेकला लगबगा, कोठे कळेना मला

तों बोले मजला प्रिया " दिसतसे हा भागला चालुनी
पैसे देअुन वाहनांत बसुनी कां जाअिना येथुनी ?
नाही ताकद काय यास अगदी खर्चावयाची करीं ?
कीं जाण्यास्तव योजना न करि कां कोणा दुजाची तरी ? "

" छे ! छे !! काय कमी, वरूनि घरचा वाटें असावा भला
नाही वाहन या पथीं म्हणुनिया पायीच हा चालला
याचा आप्तच अत्यवस्थ, अथवा कोणी असावा दुरीं
भेटाया म्हणुनी तया निघतसे हा वाटतें सत्वरीं

तो बोलें " पसरून संप–वणवा सर्वत्र मुंबापुरीं
पोटा घे चिमटा, न गाठिस रुका, जातो म्हणूनी घरी "

–विष्णुसुत अंब्रजकर
(रामचंद्र विष्णु कुलकर्णी)

# ❋ जीवन मम फुललें ❋

जीवनांत नैराश्येचें कृष्ण पटल दाटलें
आशेच्या किरणां म्हणुनी बंधन तें पडलें ।।धृ.।।
आतां नुरली सुखशीतलता
क्षणोक्षणीं ये मनि दुर्बलता
विषण्णता ही वाढत असतां
जीवनपुष्पच जीव्हाळ्याच्या किरणाविण सुकलें।।१।।
आशाकिरणे अशी लोपतां
घटकोघटकीं अुठतां बसतां–
हृदयीं भरते उदासीनता
विषण्णतेच्या मार्गावरुनी जीवनौघ अडथळे ।।२।।
जीवनांतलें सौख्य हरपलें
धैर्यसर्वही नष्ट जाहलें
अंतरिचे ते अश्रु आटले
अंत जीवनाचा तो कैसा होअिल ? मुळि न कळें ! ।।३।।
थांब मना तूं ! बघ हें पुरतें
चिखलामधुनी कमल अुगवतें
अपयशांतुनी सुयश लाभतें
निशा देविच्या अुदरिं पहा हें सूर्यबाळ जन्मलें ।।४।।
तिमिरांतुनिया किरणे पसरति
नैराश्येचें पटल सारिती
सौख्याचा मज मार्ग दाविती
किरणांच्या या सुखस्पर्शानें जीवन मम फुललें ।।५।।

–सौ. अुषा खेडकर



परिचयः—कवि **कमलात्मज** हे अुत्तम प्रकारचे वैदिक व ज्योतिषी असून काव्यनिर्मितीचा त्यांना छंद आहे. 'पंचमी' काव्य-संग्रहापासून ते कवित्रय मंडळाचे सदस्य आहेत. त्यांचें कांही काव्य साप्ताहिक 'वनश्री' मध्यें प्रसिद्ध झालें असून शाळांतून व गावां-गावांतून त्यांचीं काव्यगायनें झालेलीं आहेत. हे आपल्या कविता सुंदर गाअून दाखवितात.

कवि:—कमलात्मज

# मला ओळखाल कां ?

१) शंखासम मी अुभा छेदितां
चक्र भासतों अडवा चिरतां
समूळ बघतां जणु त्रिपुरारी
वैष्णव असुनी, वैष्णव वैरी
( अुत्तर—कांदा )

२) गोल हरित गुबगुबीत गोटी
मदिरेची माताच गोमटी
( उत्तर—द्राक्ष )

३) अेक कर्ण, अति धवलहि कांती
कुणी कधीही पहा चुंबिती
( अुत्तर—कप )

४) अडीच अिंची, तिज कटदोरा
देह जाळिते परोपकारा
भक्त तिचे ते तिला चुंबिती
अर्धी अिंची करुन त्यागिती
( अुत्तर–विडी )

* *

## ● काजळ ●

त्यागाचें तें न्हाणें झालें । क्रोधी वस्त्रानेही पुसलें
हेमकांतिच्या बाळाला या । काजळ घालूं ॥१॥

त्रयतापाचे होती धोंडे । देहपणती तेल थोडें
तेल अज्ञानाचें कोडें । काजळ घालूं ॥२॥

दुर्बुद्धीचा कापुस घेअुनि । विकल्पाच्या शेपा भरुनी
सत्संगाची ज्योत लाअुनि । काजळ घालूं ॥३॥

सद्धर्माचें ताट घेअुनी । हरिनामाचें काजळ काढुनि
भक्तीचें नवनीत मिसळुनी । काजळ घालूं ॥४॥

सटवाईचें लिखीत पुसण्यां । निर्मळ दृष्टी प्राप्त होण्यां
भाग्यवंत भव डोळयां, भाळीं । काजळ घालूं ॥५॥

बाळ माझें पंढरिराया । सुगुणीं सालस करि बा सखया !
'कमलात्मज' हा नमितों पाया । काजळ घालूं ॥६॥

–कमलात्मज
(मेघशाम नरहर जोशी)

# आहे रविवार !

रोज अुठतसें पांच वाजतां पहांटच्या वेळीं
आठ वाजलें अजुनी गादी गोळा ना केली
उठून बसलों गादीवरती आळस परि फार
विचार करतां उत्तर येतें "आहे रविवार" ॥१॥

चूळ भरोनी झणीं पातलों चहा प्यावयासी
घेतों घोट न, तोंची आले; मित्र बसायासी
" दाढी अजुनी नाही केली वेळ कसा फार ? "
हसुनी त्यांना उत्तर दिधलें "आहे रविवार" ॥२॥

आई वदली "बंब तापला स्नान करून घेई"
"रोजच असते मजला असली कामाची घाई !"
खेळ चांगला किती लागला 'मायाबाजार'
बाळू पुसतो "जाऊं का मी ? आहे रविवार" ॥३॥

जेवण करूनी जरा पहुडलों विश्रांतीसाठी
झोंप लागली चटकन मजला ना होतां कष्टी
शिकरण केलें, खमंग होत्या पुऱ्या छानदार
कारण पुसतां आई वदली "आहे रविवार" ॥४॥

"सौ." ला घेअुन फिरावयासी गेलों बाहेर
छोटचा, नंदू प्रश्न विचारुनि करिती बेजार
"या परि बाबा रोज रोज ना फिरण्या येणार ?"
"असें कराया रोज रोज का येतो रविवार" ?॥५॥

–दि. अ. देशपांडे, फलटण

# ★ प्रेमनगर ★

चल जाऊं त्या नगरीला ॥धृ.॥

जिथे प्रीतिची करती पूजा
मान मिळतसे प्रिय व्यक्तींना,
दुजा भाव नी हेवा दावा–
नसे आसरा यांना उरला ॥१॥

प्रचीति जेथे सत्प्रेमाची
अतिशयोक्ती तेथे कैची ?
पूजा करुनी प्रीति–देविची
आळविती तिज क्षणाक्षणाला ॥३॥

झिडकारूनी सर्व बंधनें
जाऊं तेथे चल लगबगिने
प्रेमाला नच जिथे बंधनें
जाऊं तेथे रहावयाला

चल जाऊं त्या नगरीला ॥३॥

–शशिकांत श्रीधर देशपांडे



परिचयः–कवि रमाकांत आर्ते हे सौराष्ट्रांत जामनगर येथे हातकागद केंद्रांत सुपरवायझर आहेत. 'पल्लवी' या काव्यसंग्रहांत व साधना, बलवंत रूपगंधा, श्रीदीपलक्ष्मी वगैरेंतून त्यांच्या कविता व माहितीपूर्ण व्यक्तिपरिचयात्मक लेख प्रसिद्ध झाले आहेत. यांचें शिक्षण मॅट्रीकपर्यंत झालें आहे. जन्म १९३५.

कवि–रमाकांत आर्ते

# रक्त तेंच तें–

अजून आहे
रक्त तेंच तें

गारठलेलें...
विस्मरण्या परि

पहा जरा ही
अधरा वरली

धूसर रेषा
जांभुळलेली

## पहांट–

अशी पहांट
शाल पांघरून
निळ्या धुक्याची
अुंबरठ्यावर...
आग अुरीं दुणावते
रात्रीच्या—
डोळ्यांतील लालसर
ओशाळ्या जागरणाला पाहून.

* *

## नेणिवेच्या कांठावर–

नुक्तें गात्रांगात्रांतून
वेड मोरपंखी होतें
अून, विसाव्याचें मला
नुक्तें खुणावीत होतें
श्वासदक्ष पापणीला
स्पर्श चेतलेला होता
रक्तारक्तांत अूर्मीचा
भर शीगोशीग होता
घ्याया क्षितिज कवेंत
कळा अंगधीट होत्या
माझ्या पार्थिवपणाला
मूक मनोव्यथा होत्या

नेणिवेच्या कांठावर
स्तब्ध स्तब्ध रात्र होती
डोळयांतील निळी झेप
त्यांत रंगधुंद होती.

* *

## अर्धी रात्र उरावर–

कधी येतो धुक्यांतुन
गंध ओल्या गवताचा
मिटलेल्या पापण्यांना
स्पर्श जाणवतो त्याचा

भवताल वेढतसे
कधी काळोखाची गाठ
असहाय माझें मन
सांवरितों झोके खात

हरवला श्वास श्वास
घेई अवचित जाग
मिट्ट काळी अर्धी रात्र
स्वतःशींच भयभीत

तेव्हां तुझ्या वियोगाची
आग मनीं अुफाळते
अर्धी रात्र अुरावर–
आणि रिती मी अुरते.

* *

# शल्य–

सुखवेड्या कल्पनेंत
विसरलों देवपण
रंग रंग अुधळीतां
झालों पुरा मी बेभान
रूपदक्ष सुखासाठीं
दीपकळी मालवली
मोहापाशीं नित्य नवी
बरी सोयरीक केली
आतां पायाखालीं फक्त
अेक अनोळखी वाट
भुतें भंगल्या स्वप्नांची
फेर धरून नाचत.

* *

# बुडालेले सूर–

मधें सुटतांना
शब्द बेसावध
निळ्या बुबुळांनी
जिंकली पारध

नकळत माझा
गेला आहे तोल
गालांनाहि त्याची
लागली चाहूल

सुखावला श्वास
भिजावा तृप्तींत
बुडालेले सूर
मौनाच्या डोहांत.

* *

## मुकें वाकलें आकाश—

तुझी कूस वळतांना
मन अुसासें; परंतू

न कळाले पदराचे
तुझ्या ढळलेले हेतू

खोल पहावें डोळयांत
रितें जरी माझें मन

झेप घेअून वेगाने
भिजें हळव्या स्मृतींत

असें तुझ्यापाशीं मात्र
किती जहराचें होष !

जडावल्या पापणीशीं
मुकें वाकलें आकाश.

—रमाकांत आर्ते



परिचय-**सौ. शकुंतलाबाओ दाते (मंडलीक)** बी. अे. शिक्षण पुणें येथे हुजुरपागा व फर्ग्युसन कॉलेजमध्यें झालें. १९३६ पासून काव्यरचनेस प्रारंभ. कॉलेज मॅगॅझिन्स्, आनंद संजय, सैनिक समाचार, महाराष्ट्र विस्तार, मुलांचें मासिक वगैरेंमधून कविता प्रसिद्ध. नाटय व गायनाची आवड. यजमान मेजर श्री. व्हो. आर्. दाते E N. T. Specialist असून वास्तव्य अलहाबाद येथे आहे.

कवयित्री-**सौ. शकुंतला दाते**

# ∷ संक्रमण ∷

दुडू दुडू अंगणांत येअी बाळ हा धावत
धावतां धावतां बघा, चित्त लागलें कशांत ?
"आअी ! संक्रांत संपलीं, आतां कोठून ही आली ?
निळया निळया जळामधें अहा ! हलव्यांची जाळी !" ॥१॥

" बाळा ! हलवा नव्हे तो, शुभ्र तारकांचा थवा
देवाघरीं संक्रांतीला आला बहर हा नवा
चंद्रज्योती लुटू दिल्या अिंद्राणीच्या रे महालीं
दैवें धाडुनी दिधल्या, राजा ! तुझ्या घरकुलीं ॥२॥

चांदण्यांच्या रूपें आले हलव्याचे शुभ्र दाणे
देवाघरचें हें लेणें तुला खाऊच्या रूपाने
पाहूं अेक गोड पापा ! गोड निसर्ग रूपांत
गोड खाअूं; गोड बोलूं; हो चंदेरी बरसात ! ॥३॥

'आनंद' जानेवारी ५५

* *

## उपराते

अेकदा तरी नाजुकशा तव
नेत्रांनी हलविल्या भावना
जरी विसरशी निमिषमात्र मज
फुललें उर अभिमाने बघना ! ॥१॥

विसराया ते क्षण प्रणयाचे
अशी मनाची केली समजुत
अैकेना मन वेडें माझें
स्वप्न तरंगीं अधीक गुंतत ॥२॥

वाटें विसरुनि जावें सगळें
अन् अुधळावें जीवन अपुलें
ज्याची त्यांस नकोशी होतां
हाय ! व्यर्थ त्याविणें हें जिणें ! ॥३॥

आज परंतु कसें ? कुठुनिसें ?
झालें माझ्या गृहिं तव येणें ?

झाली अुपरति, अुगीच रुसलें !
"प्रेमपाश हे कधी न तुटणे" !

* *

# तिन्हीसांज होतां–

तिन्हीसांज होतां
वाजतीं पाअूलें
मन अुचंबळें
क्षणोक्षणीं ॥१॥

विसर कसा हा
पाडतां पडेना
भान तुझ्याविना
नुरें मुळी ॥२॥

संगतीची सारी
घडते किमया
लाविलीस माया
कां रे ! तुवा? ॥३॥

अेक क्षणभरीं
विसंबली नाही
प्रेमाची साअूली
तुझी मला ॥४॥

साअूलीविणे रे !
व्यर्थ जिणें होअी
होअी तुजमुळे
सर्व आतां ॥५॥

रखरख सारी
जाळीतो अुन्हाळा
प्रीतीचा जिव्हाळा
आटवितां ॥६॥

कशी घालूं वेंडचा !
मनाला समज !
कळूनिया बघ
अूमजेना ! ॥७॥

भोळ्या जिवा आतां
विसर सगळें
मोहजाल तुटें
तटतटां ॥८॥

चमकती तेजें
ताऱ्यांचे समूह
चंद्राला ते मोह
घालिताती ॥९॥

| | | |
|---|---|---|
| खेळतात सारे | क्षणाचा सुखद | नश्वर जगत |
| क्षणाचे सोबती | सत्याचा आभास | नश्वर ही प्रीती |
| रात न संपती– | जीवनाची आस | दाहक सत्याची |
| लोपती तों ॥१०॥ | अमर ही ॥११॥ | जाणीव ही ॥१२॥ |

एस्. एन्. डी. टी. कॉलेज मॅगेझिन् आक्टोबर ५६

* *

# यायचें असेल जरी–

यायचें असेल जरी मधुप बनुनि हळुच ये
हृदय–पुष्प–पाकळी कणाकणांत टिपुनि घे ॥

मद्यप्राशनांत तुझी पूर्ण तृप्ति होऊं दे
मग खुशाल अंतरांत मुक्तपणे फिरुनि घे ॥

यायचें असेल जरी निमिषमात्र हो प्रकाश
नेत्रद्वयें जा मानसि खोल खोल दीप्ति आंत ॥

प्रेमांधच अंतर मम तव प्रेमें उजळूं दे
तेजपुंजशा प्रभेंत शांत शांत होउं दे ॥

यायचें असेल जरी जाउं नको दूर पुन्हा
जायचेंच होतें तर; कां न जाळिल्यास खुणा ?

मोहपाश टाकुनि ज्या, उमटविल्या मन्मनीं
पुसति न त्या लवभरहि विरह–अश्रुसिंचनी !

–सौ. शकुंतला दाते, बी. अे.



कवि:–गो. वा. केळकर

परिचय:-कवि गोविंद वासुदेव केळकर हे बेळगाव येथे शिक्षक आहेत. बालपणापासून काव्य वाचनाची व रचनेची आवड. काव्यलेखनाबरोबरच त्यांचें कथालेखन व बालसाहित्यलेखनहि चालू आहे. जीवनशिक्षण, वसुधा, सविता, मुलांचें मासिक, चांदोबा, बालक, आनंद इत्यादींतून लेखन. राजसतीश, मोत्यांचा कंठा, देवदूत इत्यादि गोष्टींचीं पुस्तकें प्रसिद्ध. अभयकुमार ही कादंबरी बालकांसाठीं ते सध्या लिहीत आहेत.

# झुळुक लाडकी तरळत येतां–

झुळुक लाडकी तरळत येतां
रोमांचाने नटते राई
आम्रतरूंचा धुंद फुलोरा
स्पर्श सुखाचीं गीतें गाई

मुग्ध बालिका बकुल सखी ती
गंध सांडिते खालीं अविरत
हरित तृणांवर येतो उसळुन
नव नवलाचा तरंग रंगत

स्मित हास्याच्या लहरत लाटा
नील नभांतिल जलदांवरतीं
कंपनांतुनी अन् धरणीवर
प्रसाद बिंदू कण कण गळती

सान गोजिऱ्या पांखरांचिया
कुशींत होतें नाजुक स्पंदन
कुजबुज करुनी गुपित अुमलें
नजर चोरटी अुरास बिलगुन

लाख कळयांच्या नाजुक ओठीं
स्मितरेखांची मोहक लाली
वसुंधरेच्या वक्षांवरती
श्यामल संध्या छाया खुलली

मृदु वीणेवर सूर अुमटती
दिव्य सुखाची होत सांगता
तृप्तीचा मधु गंध पसरतो
झुळुक लाडकी तरळत येतां.

* *

# दिपावलीची रात—

तिच्या मुखावर कांति सुधेची
नयनांतुनि बरसात फुलांची
युगायुगांचा परिमल उधळित; अपुल्या संसारांत
आज ये दिपावलिची रात !

# दीन बाला—

अर्धपोटिं आज अुभी दारिं दीन बाला
जीर्ण पदर पसरित अन् लववुनी शिराला ॥धृ.॥

तप्त धरा तप्त वात
सांडे रवि अग्नि–स्रोत

दीड वीत पोटाची प्रखर आंत ज्वाला ॥१॥

सुकलेल्या अधरांतुन
आर्त गीत गात मधुन

कळवळून मारितसे आपुल्या अुराला ॥२॥

खोल खोल नयनांतिल
प्रकट भाव होत सकल

डोळस ती असुनि देव आज अंध झाला ॥३॥

धनिका ! तव महालांत
लाख दीप तेवतात

दान–हीन पदराला पाव रे दयाळा !॥४॥

# आशा–

जीवनाची सोबतीण
आशा एकच आपुली
कुडी जगते मनूची
तिला आशेची साअुली

–गोविंद वासुदेव केळकर

परिचयः—कवि **शेष राम कुलकर्णी** बी. अे. यांचा जन्म १९३२. राजेश्वर (बिदर) न्यायालयांत हे लेखनिक म्हणून आहेत. 'अमृत', 'महाराष्ट्र', 'प्रतिष्ठान', वगैरें मासिकांतून यांच्या कविता प्रसिद्ध आहेत. त्याचप्रमाणें 'कल्पफुलें' व 'संगमधारा' या प्रातिनिधिक काव्यसंग्रहांतूनहि यांच्या कविता प्रसिद्ध आहेत. काव्याप्रमाणेंच अितर गद्य लिखाणहि त्यांनी लिहिलेलें आहे. पण तें अप्रसिद्ध आहे. 'हिरवळ' नांवाचा त्यांचा अेक कथासंग्रह असून 'पैसा आणि फासा' या नांवाची अेक कादंबरीहि त्यांनी लिहिलेली आहे. सभासंमेलनांतून व अितर ठिकणींहि त्यांचीं काव्यगायनें झालेलीं आहेत.

# मनोगत

सांगावींत तुला मनोगतें गे !

असेल वाटलें कितीक वेळां !

अंतरिं माझ्या या

होतें तसेंच कांही तरी, पण—

जसें उरीं तव मला पाहतां !

* *

# खुणवित कोणा ?

कळशी घेउनि नाजुक हातीं
कोण नवोढा येत समोरुन ?

स्वप्निल सुंदर !
असें भिरभिरें ओतुन नेत्रीं

अलीकडे ही
खुणवित कोणा ?

* *


# निघालों आहे……

दीर्घ विरहाच्या
तापल्या अुन्हानं
निघालों आहें
पोळून मी !

तुझ्या नजरेचं
आअिस्क्रीम
जरा…
घेअून येशिल कां ?

* *

# आसुसलेल्या शब्दांचे–



तुझ्या ओठांच्या
पिकल्या डाळिबांतील
आसुसलेल्या शब्दांचे
लाल दाणे
टिपून घेण्यासाठीं
माझ्या कानांचे पोपट
केंव्हांचे
बारींत येऊन
बसले आहेत !

* *

# ⁑ निळसर सुंदर ⁑

निळसर सुंदर नयनिं बोलक्या
सहजच कांही तरी बघावें
सहजच कांही तरी खरें पण
ती तर केवळ छाया अपुली !

–**शे. रा. कुलकर्णी** बी. अे.



कवयित्री:–**सौ. कमलाबाई सोहनी**

परिचय:–**सौ. कमलाबाओी सोहनी** यांचें शिक्षण हिंदी कोविद, प्रविण व हिंदी शिक्षक सनद पर्यंत झालें असून गेल्या १८ वर्षांपासून सामाजिक कार्य व हिंदीचे वर्ग चालविणें यांस त्यांनीं वाहून घेतलें आहे. यांचें विपुल काव्यलेखन असून सभा, संमेलनांतून, विविध प्रसंगोत्सवांतून, महिला मंडळांतून व नभोवाणीवर यांचीं प्रभावीं काव्यगायनें होतात. कुटुंब नियोजनावरील 'सांगत्यें अैका' हें पोवाडयाचें पुस्तक प्रसिद्ध असून त्यांचा 'काव्यकमल' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध होणार आहे.

# मानवतेचें मंदिर पडलें !

अहा ! बालकें या विश्वाचीं गमती मजला त्याचा प्राण
प्राण घ्यावया शासक अुठले, कुठलें त्या बाळांना त्राण ? ॥१॥

पद–कमलांचे देठ अंगठे चोखितात मन लावुनिया
हाताच्या बोटांतिल नव मधु चोखितात रस घेअुनिया ॥२॥

शैशवांत मुख–कमलावरतीं हास्य गोडसें माधुरिचें
मुखचंद्राचें चुंबन देसी जाणुनि मम गुज अंतरिचें ॥३॥

माझ्या मंदिरिं लोचन–ज्योती अखंड तेवत चकाकती
काय न्याहळति भविष्य पुढचें, राहिल कां येथे वसती ! ॥४॥

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्र
अनुक्रम. वि: ४५



तुम्हां सारखीं कोमल बाळें रोज जन्मती भूमिवरी
माता अिच्छी शांति–सुखाच्या ग्रहास सजवी जन्मभरीं ॥५॥

बहरत आहे मानव्याचा बाग, गोष्टि करिती कलिका
"मानवता देवीचें स्वागत सहर्ष झटुनी करुं या कां ? ॥६॥

पुष्परसाचें पेय देअुं या गाणीं गातिल झरे नद्या
वृक्ष घालतिल सुगंधि वारा तृण हिरवळ कोमल गाद्या ॥७॥

प्रतापि भानू, शांत चंद्रमा मार्ग दावतिल सत्याचा
भजेल मानव माणुसकीला, शब्द न काढिल हत्येचा ॥८॥

परंतु जग हें युद्धां सजलें शस्त्रें सजलीं सिमेवरीं
पाठ शांतिचे, करार खोटे रोज छापिती पृष्टभरी ॥९॥

काळ अुलटला, धावत सुटला मानव शोधित नवशक्ती
माणुसकीचें वस्त्र फाटलें, शोधुन काढी अणुशक्ती ॥१०॥

खणखणाट नित शस्त्रास्त्रांचा धाड धाड तोफा गोळे
माया प्रेम नि मैत्री सरली झालें सारें वाटोळें ! " ॥११॥

मानवतेचें मंदिर पडलें ! मानवता कण्हली; वदली
"अंध मानवा ! शोणित-सागर अडव तयाला; घे अुसळी?।१२।

अेक दुजांवर प्रबळ व्हावया शोधाचे वेडे चाळे
मायेच्या ना कुशित वाढली ? हीं असलीं कसलीं बाळें" ?।१३।

–सौ. कमलाबाई सोहनी

परिचयः–कवि **ना. मा. तिडके** हे वेदविद्या विशारद साहित्य मनीषी, कला कोविद, विशारद आहेत. कथा, कादंबरी, काव्य व स्फुट लिखाण त्यांनी लिहिलेलें असून कादंबरी व काव्यसंग्रह लवकरच प्रसिद्ध होणार आहेत. 'पालवी' या काव्यसंग्रहांत त्यांच्या कविता प्रसिद्ध झालेल्या आहेत.

## नको शृंगार आज

नको शृंगार साज ह्या क्षणीं
वीत शोक भाव ना अंतरीं
गा गान वीतराग नादती
पायीं पैंजण प्रीति शृंखला

होय अंगांग रोमांचित परि
तुझ्या संगतीं तुझ्याच मिठींत–
भान हरपतें नि जाग येते
अकारण जाळी तव अबोला

तुझ्या लोचनी तेवि पहावी
जन्मोजन्मीची अभंग प्रीती
तुझ्या ओठीचा अन् टिपावा
अंतरीचा भाव भुकेला

नको शृंगार आज साजणी !
नच घ्यावी गे ! आतां मदिरा
मस्त गंध अखंड सुटावा
कवटाळावें गत क्षणाला

* *

# विसर्जन हें—

विसर्जन हें—जनमेळावा हा भवतीं
शृंगार हा कशांस ? संपली जयंती !
आसमंतात दरवळलें तें कैकदां—
गीत...मोहर फुलला...जळालाहि कैकदां !
कुणी लुटली रे ! मम अनमोल संपदा ?
कुंभ कां रिकामेच हे परि ओसंडती ?
आघात पुरे ! द्या सजा ठोठावुनी
पुनरपि स्मार्त गीत स्रवेल...आलापिनी
पान्हावतिल मधुभाव क्षणभर लोचनीं ?
सत्तेच्या गुलामास न फिकीर पुणती
अमललीं भावपुष्पें, सुकलीं निरंतर...
अंतराळीं विरले ते अंतर्हित स्वर
अंगणीं ह्या दिवाभीतांचा घुत्कार !
देवघर हें नच स्मशान उरलें अंती !
विसर्जन हें...

—ना. मा. तिडके



परिचयः–**वा. न. सरदेसाई** यांचें शिक्षण मॅट्रीकपर्यंत झालें असून गुजराथमधें टेलिफोन खात्यांत काम करून ते अुच्च शिक्षण घेत आहेत. लघुकथा, सत्यकथा, काव्य, अेकांकिका हे त्यांचे लेखनाचे आवडते विभाग आहेत. काव्यलेखनावर त्यांचा विशेष भर आहे.

कविः–**वा. न. सरदेसाई**

## :: स्वर्गपुरी ::

सह्याद्रीच्या राकट तांबुस
पाठीवरती रुळतो शेला
जरतारीची किनार लेअुन
अेक रुपेरी ओघ चालला ॥१॥
जुनी पुराणी चिंच अुंचशी
वळणावरती सदा निवारा
बोध देतसे जणुं पांथस्था
मधुर आम्ल हा जगत् पसारा ॥२॥
घुंगुरवाली शिरीं घोंगडी
अुंच नक्षिची हातीं काठी
अेक गुराखी हळूच ठेवी
'इ ऽ ऽ' घालाया बोटें कंठीं ॥३॥

कुणी नवोढा चाले ठुमकत
चारीचें सांवरी डालगे
गालावरतीं चढे रक्तिमा
रजनीच्या मधु स्मरणासंगें ॥४॥
कांठोकांठ भरूनी अमृत
स्तन्यपूर्ण हें परतें गोधन
अुरपतलेल्या कुशी सांगती
धन्याघरीं पुण्याचें अर्जन ॥५॥
वसलें आहे हरित कोंदणीं
गाव चिमुकलें नदी किनारी
मुग्ध सुधा वाहते या अिथे
स्वर्गपुरी ही खरीच दुसरी ! ॥६।

* *

## भैरवी

हेंच आतां गायचें ना गीत अेकांतीं मनाचें
जीर्ण वीणा या तनूची साह्य बाकींच्या सुरांचें ॥१॥
नाद अस्तांतून घुमला भैरवीच्या संगिताने
कंपताती याच तारा रुद्ध कठाच्या स्वराने ॥२॥
शांत झाली गोड मैफल शांत झाली काळरात्री
विश्‍व विझला अेक तारा; शांत केंव्हाची धरित्री ॥३॥
शांत झालें सर्व कांही प्राण नाही तेज नाही
लोपली देखील आतां जीवनाची भैरवी ही ॥४॥

—वासुदेव नरहर सरदेसाई



कवि:–विश्वासकुमार

परि –हे **विश्वासकुमार** याच नांवाने प्रसिद्ध असून त्यांचें साहित्य, रविवार सकाळ, लोकशक्ति, मंदिर, चेतना, किशोर, विद्यामंदिर, बालसन्मित्र, नवहिंद, जयहिंद, तलवार, ज्वाला, आझादहिंद, ज्ञानोदय, अुदय, प्रगति, प्रेषित, नागरिक, सांजवात, भाववीणा, अित्यादींतून प्रसिद्ध असून मुंबअी नभोवाणीवरूनहि त्यांच्या काव्याचें ध्वनिक्षेपण नेहमी होत असतें. 'बालविहार' या मासिकाचे कांही काळ ते संपादकहि होते. शिक्षण ट्रेंड, हिंदी शिक्षक सनद, मॅट्रीक.

# सासरी जाणाऱ्या मुलीस–

थांबवि आसू बाळ ! ॥धृ.॥
कशास केले ओले डोळे
घरीं सुखाने जाअी बाळे !
नकोस विसरूं शिक्षण अिथलें
तुझें बोलणें आणि वागणें, शिकवण माझी त्यांत ॥१॥

माहेरातिल तव धिंगाणा
कौतुक वाटें मनि बघतांना
परंतु 'तेथे' खुपेल नयनां
" किती थोरली गृहिणी झाली " म्हणतिल बघुनी भाळ ॥२॥

तुझी भावना जाणुनि घ्याया
अिथेच सारीं समरस व्हाया
मायेचा कर गोंजाराया,
कष्ट करोनी तिथे बोलणीं अैकुनि घे लडिवाळ ! ॥३॥

तुझी चुकीची कृती पाहुनी
हासुन देती अिथे सोडुनी
परंतु तेथे अुणी बोलणी
क्षणाक्षणाला तुझ्या मनाला सलतिल कडवट बाण ॥४॥

लेक लाडकी कुलवंताची
स्नुषा जाहली धनवंताची
नकोस सोडूं रीत आमुची
अदब नम्रता आणि सुशिलता काढि कुळाचें नांव ॥५॥

मराठी ... संग्रहालय
दा. क्र. ११२...
शाखा (...

नकोस पाहूं पुन्हा फिरूनी
रडवें तव तें वदन बघूनी
हृदय आमुचें जातें हलुनी
बघुं दे बाळे ! पुसले डोळे, हांसत जा लडिवाळ ! ॥६॥

(मुंबअी नभोवाणीच्या सौजन्याने)

* *

# नव कविता

( समग्र नवकवींची क्षमा मागून )

नव्या कल्पना, नवे विचार,
बाजुस ठेवा जरा दूरवर

'टाळक्यांत' त्या 'कांहीं' नसतां
बसा लिहाया–मग नव कविता ! ॥१॥

शब्द अर्थहिन लिहा खुशाल !
छोटी मोठी बनवा ओळ

कशास बंधन काव्यकलेचें ?
मनचे तट्टू दौडायाचे ! ॥२॥

प्रास नि यमकें प्रथम झुगारा
गण मात्रांचा अुगि जोजारा !

अुरल्या सुरल्या काव्यरसांना–
धाब्यावर मग बसवा त्यांना ! ॥३॥

तंत्र असें हें अवलंबून–
कांही–कसलें–खरडा दडपुन

स्वरूप येअिल लिहिल्या शब्दां
मनासारखी जुळेल कविता ! ॥४॥

दहा पांच त्या लिहतां कविता
अुदो अुदो मग होअिल पुरतां !
टीकाकार नि रसीक ( ! ? ) वाचक–
थकती अवघे कौतुक करतां ! ॥५॥

गाअुनि; छे ! छे !! वाचुनि दावा
संमेलन हें पुरें गाजवा !
मिळे अुपाधी कवे ! आजला–
बघा 'नवकवी' वाङमयांतला ! ॥६॥

जुन्या कवींचा अन् काव्याचा
'मोरवळा' हा बनेल नुसता !
आणि तुझ्या रे ! "असल्या कविता"
मिळवुनि देतिल कीर्ति नि वित्ता ॥७॥

शीर्षासन हें वाङमयांतलें
मजा नवकवे ! तोंवर चाले–
मिळेल पलटी, कधि तरि काळा–
स्थान ? तुझें तयिं ? लिहूं कशाला ? ॥८॥

–विश्वासकुमार,
साहित्यप्राज्ञ

**परिचयः–डॉ. अनंतराव सरदेसाई** यांनी मराठी व पोर्तुगीज अशा दोन्ही भाषेंत विपुल साहित्य लिहिलें असून पोर्तुगीज भाषेंतील कथा व नाटकें प्रसिद्ध आहेत. मराठी लिखाण मुंबअी, कोल्हापूर, बेळगांव इत्यादि ठिकाणच्या मासिकांतून प्रसिद्ध आहे. म्हारदळ येथे त्यांची प्रॅक्टीस चालूं आहे. 'शेजगीता' हा काव्यसंग्रह व 'भारती' ही नाटिका लवकरच प्रसिद्ध होणार आहेत. पोर्तुगीज भाषेंत २५ च्यावर यांनी नाटकें लिहिलेली आहेत. मराठी नियतकालिकांतून त्यांचें काव्य, लघुकथा व विनोदी कथा प्रसिद्ध असून 'कुळागर' या गोमांतकीय कथासंग्रहांत 'पापाचें प्रायश्चित' ही कथा प्रसिद्ध आहे.

# स्वप्न माझें भंगलें !

जीवनीं आनंद नाही, स्वप्न माझें भंगलें
जीवना ज्या अिच्छिलें मी, स्वप्न सारें जाहलें
कूल–शीलें युक्त कन्या, पत्निठायीं स्थापणें
वागणें रामापरी मी... स्वप्न माझें भंगलें
रूप नाही मान्य मातें, रूपवंतीं प्रश्न ना
निर्धनाची होअु द्या ती...स्वप्न माझें भंगलें
शिक्षिता ती, मोद मातें, ना जरो तें, तोचि हो–
'आ..इ..ई..ऊ' शिकवितांना स्वप्न माझें भंगलें
रांधतां घाअी करूनी जेवतां खोडी करूं
बोलतां रागे मुखा त्या.. स्वप्न माझें भंगलें
मित्रशत्रू द्वारिं येतां आग्रहें त्या वाढणें
अैकुनी त्यांच्या मुखाने...स्वप्न माझें भंगलें

काव्य माझें वाचुनीया, अर्थ सांगे, बोलतां–
अश्रु येतां, धोतराने ...स्वप्न माझें भंगलें
शींक येतां एक, तीतें डॉक्टरांना आणणे
रात्र अख्खी जागुनीया...स्वप्न माझें भंगले
पूर्व जन्मींचा रिपू तो, पालकाचें रूप घे
.. दंशिलें नागापरी नी...स्वप्न माझें भंगलें

* *

# ऐकाकी कंठुं कसें ?

ऐकाकी कंठुं कसें दीर्घ दीर्घ जीवना ?
ऐकांकीं कोणि नसें ऐकांकीं शून्य ना !
भासतसें जीवन हें गोकुळची रात्र ना !
वाटतसें जीवन हें अुत्तरध्रुवि दिवस ना !
ध्रुवावाणि अढळ अिथे दुःखाचें स्थान ना !
छायेसम सोडि न कधि मानवास वेदना
आत्म्यासम अमर अिथे क्लेशांची मूर्ति ना !
देवांसस कोठेहि कधिहि असे यातना !
केव्हांहि कोणतीहि ना पुरते कामना !
अतृप्तचि राहतसे कसलीही वासना !
सौंदर्या बघुनि कुठे अुचंबळे भावना–
ऐकाकी हें स्मरूनि; जीव तींत राहिना
ऐकाकी कंठुँ कसें दीर्घ दीर्घ जीवना !
ऐकांकीं कोणि नसें, ऐकांकीं शून्य ना !

–डॉ. अनंतराव सरदेसाई

# अमृत घट

लाल गोजिऱ्या मुठींत भरले
अमृत घट अिवले
चुटुचुटु चोखुनि बाळ सानुलें
झोंपी तें गेलें

हास्य मुखांवर गोड विलसलें
कृष्णरूप खुललें
भुरभुर अुडतें जावळ काळें
ओठ लाल जुळले

लाल गुलाबी गाल शोभले
भाळीं तीट खुलें
नयनीं काजळ, गालावरलें–
गालबोट खुललें

कुशित आअिच्या जरि तें प्यालें
पोट कां न भरलें ?
म्हणून कां चोखीत बैसलें
मधुघट मुठीतले ?

लाल गोजिऱ्या मुठींत भरलें
अमृत घट अिवले

—पी. एन् कुलकर्णी

...संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...३६८...३५ दि: ...१/१२/ ५७
क्रमांक ...१६८६४... ...दि: १३/१२/६८

# कविता

अशी असावी कविता साधी
जींत नसावें शब्दांचें रण
परी असावा अर्थहि सूचक
ओघवती तनमनोहारिणी
सरिता जणु की खळखळणारी
अशी असावी कविता साधी

अशी असावी कविता साधी
पांडित्याचें नको प्रदर्शन
भावसुमांचें व्हावें दर्शन
भासावी निष्कलंक दुर्बिण
मानव्याची छबी खुलावी
अशी असावी कविता साधी

अशी असावी कविता साधी
ज्ञानेशाची अमृतवाणी
तुकयाची निर्भीड लेखणी
जतविल फुलविल जीवनवेली
अशी असावी कविता साधी

'प्रतियोगी' दिवाळी ५९

—वासुदेव कुलकर्णी

परिचय:–कवि **सादनंद राम शिरोडकर** हे मातोंड-बांबर येथे शिक्षक असून मूर्तिकार, चित्रकार व कवि अशा तिहेरी नात्याने ते प्रसिद्ध आहेत. त्यांचें हस्ताक्षर म्हणजे केवळ मोतीच. या मोत्यांनी त्यांना अनेक बक्षिसें मिळवून दिलीं आहेत. 'मधुमालती' व 'मधुमेवा' हे त्यांचे २ बालगीत संग्रह प्रसिद्ध असून 'पल्लवी', 'वंदना', 'चाहूल' या प्रातिनिधिक काव्यसंग्रहांतून त्यांच्या कविता प्रसिद्ध आहेत. 'बालसन्मित्र' या मासिकाच्या संपादक मंडळांतहि कांही काळ ते होते.

# अल्लड साधी पोर–

अल्लड साधी पोर ! सखे तूं अल्लड साधी पोर ! ।।धृ.।।
तुझें नि माझें सूत जमेना
तुझ्यावाचुनी मला गमेना
कामावरतीं चित्त रमेना
जिवास लागे घोर ।।१।।

तूं अलबेली मी अलबेला
वृथा मनीचा सोड अबोला
अभय वचन दे एकदां मला
चंद्राची जणुं कोर ।।२।।

रुचिर मनोहर मस्त जवानी
तुझे टपोरे डोळे हरिणी
पाठीवर सळसळते वेणी–
नागिण काळी भोर ।।३।।

चंद्रकोर तूं चांद मी बने
प्रीतीचें मनि फुलें चांदणें
सोड तुझें गं रुसणें फुगणें
झालिस आतां थोर ! ।।४।।

–सदानंद राम शिरोडकर

परिचयः–**बाळासाहेब नारायणराव तळवाडकर** हे ट्रेंड शिक्षक असून राष्ट्रभाषा कोविद आहेत. राष्ट्रभाषा प्रचारक व हिंदी परीक्षक आहेत. साप्ताहिक गावकरीच्या संपादक मंडळांत कांहीं काल लेखन. 'मुलांचे विविध छंद' चे लेखक. शिक्षक, शिशुरंजन, रयत, आझादहिंद, सुदर्शन, संघटना, बातमीदार, याज्ञवल्क्य, वनश्री, लोकवार्ता, बुलेटीन, गावकरी, जागृती, कल्पफुलें वगैरें ठिकाणीं साहित्य प्रसिद्ध.

# शीलवान बालवीर

बहाद्दूर बनणार ! आम्ही खेळगडी दमदार ।धृ.।।
भारतमाता प्रियतम सुंदर
राष्ट्रध्वज तो उभा मनोहर
बापूंचा आदर्श खरोखर
नमन तयां करणार ।।१।।

थोर, महाराष्ट्राचे वीर
सार्थ तयांचें जीवन सुंदर
सद्गुण–चारित्र्याचें मंदिर
मोदभरें बघणार ।।२।।

नानाविध छंदांचें आगर
अम्ही बालकें असू खरोखर
विद्या; विनयें मिळवू भरपुर
शीलवान बनणार ।।३।।

पिता नि माता माया–सागर !
गुरुजी अमुचे ज्ञानदीप तर !
लेखन वाचन करुं या सुंदर
शारदेस भजणार ।।४।।

–**बाळासाहेब तळवाडकर**

## आशा

रखरखलें तें ऊन  
जळली तीं बीजांकुरे  
धरती सोडी निश्वास  
तप्त जाहलें मानस ॥

धगधगतें अंतर  
होते तशांत भरती  
लाही लाही हो जिवाची  
दुःखाच्या त्या प्रसंगाची ॥

संभ्रमांत खुळी आशा  
अजूनीही जिवालागी  
परी करीते धडपड  
लागे प्रीतीची ती ओढ ॥

**–वासुदेव बाळाजी भावे**

| काव्य संग्रह | प्रकाशनाध्यक्ष | कवि संख्या | कव्हरसह पृष्ठें |
|---|---|---|---|
| प्रतिपदा | कविवर्य संजीव | ३ | २० |
| द्वितीया | कविवर्य मा. गो काटकर एम्. ए. बी. टी. | ३ | २४ |
| तृतीया | श्री. नाना पाठक एम् .ए. | ४ | २८ |
| चतुर्थी | कविवर्य कुंजविहारी | ६ | ३४ |
| पंचमी | श्री. गं. गो. परिचारक बी.ए.एल्एल्.बी.वकील. | १२ | ५२ |
| षष्ठी | प्रो. कविवर्य वैशाख ऊर्फ त्र्यं. वि. सरदेशमूख एम्. ए. बी. टी. | २४ | ७४ |

## ' पंचमी ' काव्यसंग्रहावरील कांही अभिप्राय

सोलापूरच्या कवित्रय मंडळाचीं प्रतिपदेपासून तो पंचमी पर्यंतचीं सर्व प्रकाशनें वाचलीं. या मंडळातर्फे प्रकाशित झालेल्या कवितेंत श्री. अघोर यांचें काव्य संख्येनें सर्वांत अधिक आहे. त्यांत विविधता आहे. तसेंच 'वाङ्मयाची वरात' सारखी गमतीदार कल्पनाहि चित्रित झालेली आहे. अितरांचेंहि काव्य अनेक विषयांवर आहे. परंतु या सर्व कवींनीं इतर प्रसिद्ध कवींचें काव्य वाचून कल्पना वैभव अधिक अुत्तम रितीने प्रकट केल्यांस हें मंडळ चांगलें नांवारूपाला येईल. मंडळाचा अुपक्रम स्तुत्य आहे.

दि. २७–२–६०

**डॉ. सरोजिनी बाबर**
अेम्. अे. पी. अेच्. डी. पुणें

**प्रतिपदा ते पंचमी**:–सोलापूरच्या कवित्रय मंडळाचा हा काव्यचंद्र कलेकलेने वृद्धींगत होत आहे. आणि त्याचें चांदणेंहि मोठें आल्हाददायक आहे. या चंद्राच्या 'प्रतिपदा' ते 'पंचमी' अशा पांच कला प्रकाशित झाल्या असून सहावी 'षष्ठी' या नांवाने लवकरच झळकणार आहे. 'प्रतिपदा' व 'द्वितीया' यांत तीनच कवींच्या कविता असून 'तृतीया', 'चतुर्थी', 'पंचमी' या संग्रहांत आणखी कांही कवींच्या कविता समाविष्ट करून मंडळाने आपलें क्षेत्र व्यापक केलें आहे. यांत विशेष अुत्साही व्यक्ति म्हणजे श्री. भ. वा. अघोर ही होय. त्यांच्या काव्यांतील हिंदुत्वनिष्ठा ज्वलंत असून त्यांची आत्मपर कविताहि हृदयंगम आहे. विशेषतः त्यांची 'तीर्थरूपास' ही विलापिका प्रासादिक व करुणरसाने ओथंबलेली आहे. हाच भाव त्यांनी आपल्या मातोश्रीस अुद्देशून लिहिलेल्या कवितेंत प्रगट झाला आहे.

'जमेना' कवितेंतील विषमद्वंदाचें चित्रण मजेदार आहे. चतुर्थीतील पोतनीस व जगदाळे यांच्या सर्वच कविता सरस आहेत. पंचमी संग्रहाचें वैशिष्टच म्हणजे श्री. म. भि. कुलकर्णी, 'विष्णुसुत अंब्रजकर', 'बुध' या जेष्ठ व प्रसिद्धी पावलेल्या नामांकित कवींच्या सरस कवितांचा समावेश हें होय. 'बुध' यांची सर्वच कविता प्रौढ सुश्लिष्ठ पंडिती वळणाची व भाषा प्रभुत्वसंपन्न आहे. श्री. म. भि. कुलकर्णी यांच्या 'गतिमंद पथिकांस' यातील अुत्कटता मनोज्ञ आहे. त्याबरोबरच 'रणशिंग' ही कविता ओजस्वी असून माझी कविता म्हणजेच 'रणशिंग' हा शाहिरीबाणा तींतून विशेषत्वाने प्रगट झाला आहे. त्याच-प्रमाणें कवि पोतनीस, जगदाळे, सौ. कुंता जगदाळे यांच्याहि कविता अुत्कृष्ट व वाचनीय आहेत. यापुढे 'षष्ठी' संग्रह प्रसिद्ध होत असून त्यांतहि या कविमित्रांच्या काव्याचें चांदणें असेच शीतल व प्रसन्न पडेल अशी आशा करावयास हरकत नाही.

दि. ७–३–६०

प्रिन्सिपॉल कविवर्य **गणेश हरी पाटील** पुणें.

पंचमी काव्यसंग्रह वाचून खरोखरच मन प्रसन्न होतें. विशेषत: कवि भ. वा. अघोर यांच्या 'झांशीची राणी' व 'हिंदूहृदयांच्या सम्राटा', पोतनीस यांची 'आजच्या तरुणांस', म. भि. कुलकर्णी यांची 'रणशिंग', पाटील यांची 'माझ्या या खेडयांत', कमलात्मजांची 'अभिमन्यू' वगैरे कविता अुत्कृष्ट आहेत. पौर्णिमेपर्यंत आपली मजल जाअील यांत संदेह नाहीं. 'पंचमी' काव्यसंग्रहाबद्दल कवित्रय मंडळाचे व श्री. अघोर यांचे मी आभार मानतों.

दि. ७–४–५९ **श्री. रामचंद्र गणेश करंदीकर**

बी. अेस्. सी. अेल्अेल्. बी. वकील, मंगळवेढे

'पंचमी' काव्यसंग्रहांत कवितांच्या आरंभी कवींचा परिचय देण्याची पद्धत योग्य वाटली. संग्रहांत विविध विषयांवरील कविता आहेत. 'आंबट हिरव्या चिंचेखालीं' यांतील दृष्य हृद्य आहे. 'स्वामिनीस' यांतील कल्पना मार्मिक आहे. 'कण मी अिवला' यांतील विरोधाभास परिणामकारक वाटतो. 'तुझा माझा सहवास' यातील भावचित्रण चटकदार वाटते. 'गंगास्तुति' संस्कृत साहित्याची आठवण देते. 'होतें मी बावरी' यांतील अनुभव भावरम्य आहे. कवित्रय मंडळांतील सर्व कवींचा अुत्कर्ष होवो.

**बाळकृष्ण रामचंद्र प्रभू**
बी. अे. बी. टी. दादर, मुंबअी

सोलापूरच्या कवित्रय मंडळातर्फे सहकारीं तत्त्वांवर वाङमय प्रकाशनाचें कार्य चालूं असल्याचें पाहून संतोष झाला. आतापर्यंत त्यांच्याकडून 'प्रतिपदा' ते 'पंचमी' असे पांच काव्य-संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. हल्ली वाङमयाची वीण झपाट्याने व सापाटून होत असलीं तरी त्यांत 'सत्यं शिवं सुंदरं' चें दर्शन कमीच. वास्तववादाच्या भोंगळ नांवाखालीं विकृत ओंगळ लिखाणच जास्त. कवित्रय मंडळाचीं प्रकाशनें त्यापासून अलिप्त ठेवल्याबद्दल संपादकाचें हार्दिक अभिनंदन करावेसें वाटतें. 'झांशीची राणी', 'हिंदूहृदयांच्यासम्राटा', 'पुंडलीक वरदा', 'पंतप्रधान', 'गंगास्तुति' यासारख्या सोज्वळ विषयांवर लिहिलेली काव्यसंपदा सात्विक आनंद देणारीच आहे. लेखन व्यवसायी या नात्यानें माझा पुस्तक विक्रेत्यांशीं बराच संबंध येतो. आजकाल अुत्तान व परभृत लिखाणांतच वाढती मागणी असल्याचे ते सांगतात. त्यांवर अुतारा म्हणून प्रस्तुत सारखीं

प्रकाशनें जेवढीं निघतील तेवढीं स्वागतार्ह. संपादक साहित्यप्राज्ञ अघोर यांचे मी मन:पूर्वक आभार मानतों.

दि. २४–८–५९ **डॉ. र. कृ. गर्दे, मुंबअी.**
अेम्. बी. बी. अेस्. आय्. अेम्. अेस्. रिटर्न.

'पंचमी' काव्यसंग्रहांतील विविध कवींच्या अुत्तम कविता वाचून आनंद झाला. कवित्रय मंडळाने अशा प्रकारें काव्योन्नतीच्या महत्वाच्या कार्याकडे लक्ष दिल्याने समाधान वाटतें. त्याबद्दल कवित्रय मंडळास व संपादक कवि अघोर यांस मी धन्यवाद देतो. अशाच प्रकारे काव्यशारदेची सेवा आपल्या मंडळाकडून घडावी व नूतन कवीस अुत्तेजन मिळावें. आपल्या प्रकाशनांची वरचेवर अुन्नति व्हावी ही सदिच्छा. 'पंचमी' काव्य-संग्रह अुत्तम कवींच्या अुत्तम कवितांनी व थोर विचारांनी नटलेला असून पूर्वेतिहासाचीहि त्यांत थोरवी आहे. सांप्रतच्या परिस्थितीचा बोध करून देणारे आणि संस्कृतीस पोषक व आकर्षक अशा प्रकारचेंच काव्य त्यांत असल्याने मन प्रसन्न होतें.

दि. २४–८–५९ **ज्योतिषी डॉ. ह. सी. राजंदेकर**
पंचांगकर्ते अकोला (मध्यप्रदेश)

श्री. अघोर यांच्या काव्यप्रेमाचें प्रतीक म्हणजे कवित्रय मंडळाचीं 'प्रतिपदा' ते 'पंचमी' हीं पांच प्रकाशनें होत. संपादकीय दृष्टया 'पंचमी' तील काव्यपुष्पांची निवड अुत्कृष्ट आहे. सौ. जगदाळे यांची 'निपुत्रिकेचे गाऱ्हाणें', श्री. म. भि. कुलकर्णी यांचा 'स्तुत्य अुपक्रम', संपादकांची 'जैसे थे' रचना म्हणजे शाश्वत मूल्यांचा अविष्कार आहेत.

दि. २७–५–५९ **बा. ना. तळवाडकर**
रावळगाव

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
३८०५८ दि: २४/१/६



साप्ताहिक मौज मुंबई दि. ७-६-५९:-(चतुर्थी व पंचमी) कवित्रय मंडळीच्या काव्यसंग्रहांची संख्या पौर्णिमेपर्यंत निश्चित जाईल, असें दिसतें. पृष्ट संख्येंत, किमतींत वाढ आहे. अेवढेच नव्हे तर मंडळांत आज १८ कवि-कवयित्री समाविष्ट आहेत. श्री. अघोर यांनी एका कवितेंत नवोदितांवरील अन्याय चव्हाटयांवर मांडला आहे. आपल्या गटाचा लेख नसला तर कचरापेटी दाखविणाऱ्यांना ते अिशारा देतात–

" संपादकहो ! जरी कोंबडें–
झांकलें तरी फुटें तांबडें "

सहकारी तत्त्वांवर आधारलेल्या ह्या सहकारी प्रकाशनांत नाना विषय आहेत. अुषेच्या गोठयांत, गारगोटीचें गर्वगीत, सौ. आअीसाहेबांस, पांडुरंगाचा धावा, गंगास्तुति, रणशिंग, निपुत्रिकेचें गाणें, बाळ पितांना, (प्रथम पत्नी निवर्तल्यांवर रामावर केलेली ) फिर्याद, झांशीची राणी इत्यादि नानारस, नाना काव्यप्रकार ह्या नवोदितांनी लीलया खेळवले आहेत.

साप्ताहिक विविधवृत्त मुंबई दि. ५-७-५९:-'पंचमी' संपादक भ. वा. अघोर, कवित्रय मंडळ प्रकाशन सोलापूर. कवि म्हणून ज्यांचा अखिल महाराष्ट्रांत नांवलौकिक झालेला नाही, पण जे मोठया हौसेने आणि अुत्साहाने काव्यलेखन करीत आहेत त्यांना आपल्या कविता रसिकांसमोर याव्यात असे वाटणें अगदी स्वाभाविक आहे. या कल्पनेंतूनच अशी सह-कारी प्रकाशनें निघत आहेत. संग्रहांतील कवींच्या कल्पना, आठवणी, जरूर रसिकांसमोर येण्याजोग्या आहेत. त्यांच्या कविता आवडीनें वाचणारे रसिक महाराष्ट्रांत कांही थोडथोडके नाहीत. नवकाव्याचा अेकीकडे कितीहि अुदो अुदो चालू असला

तरी दुसरीकडे जुन्या वळणाची साधी सिधी कविता भरपूर निर्माण होत आहे. महाराष्ट्राच्या रसिक मनाचें मनोरंजन करण्याचें सामर्थ्य तिच्या ठिकाणीं अजूनहि कायम आहे. याचें प्रत्यंतर हा संग्रह वाचतांना येतें.

साप्ताहिक समाजस्वास्थ अुमरावती दि. ३–५–५९:– दिवसेदिवस प्रकाशन ही बाब साधारण मनुष्याच्या आवाक्याबाहेर जात आहे. अशा वेळीं सहकारी तत्त्वांवर केलेला हा अुपक्रम स्पृहणीय तसाच अनुकरणीय पण आहे. श्री. अुब्रजकर यांची 'भाग्यवान आजोबा' ही कविता अुतारवयांत कुठेतरी अुगाच भटकावयाचें, अशा वृद्धांना मार्गदर्शन करील. मातांनी सांजवात लावून करुणाष्टकांच्या धर्तीवर मुलांना पाठ द्यावेत, या योग्यतेची श्री. बुध यांची 'भज सदा मनुजा कमलावरा' ही कविता आहे. सौ. अुषा खेडकर यांची 'होतें मी बावरी' ही कविता आजहि संत तुकारामांच्या 'कन्या सासऱ्याशीं जाये' या अभंगाच्या वातावरणांत नेअून सोडील. श्री. पाटील यांची 'खेड्यांतील पहांट' यांत्रिक आणि तांत्रिक युगांतील शहरवासीयांना खेड्यांतील साध्याच पण रम्य आणि सच्छील जीवनाचें दर्शन घडवील. काव्याची व वृत्तांची निवड चांगली असून विशेष म्हणजे मुक्तछंदाचा धुमाकूळ त्यांत नाहीं. शुद्धलेखनाकडेहि योग्य लक्ष पुरविलें असून प्रकाशकांना त्यांच्या अंगीकृत कार्यांत आम्ही सुयश चिंतितों.

सज्जनगड मासिक सातारा दि. १०–५–५९:–संपादक श्री. भ. वा. अघोर हे साहित्यप्राज्ञ असून त्यांच्या काव्याचा परिचय सज्जनगड मासिकांत व अितरत्र वारंवार होत असतो. दरसाल अेक काव्यसंग्रह दर गुढी पाडव्यास प्रसिद्ध करण्याची

वहिवाट त्यांनी ठेवलेली असून त्याप्रमाणे हा पांचवा संग्रह आहे. त्यांत १२ कवींच्या ४५ कविता आहेत. हा काव्यसुमन हार गुंफण्याचें कार्य निपुण कवि अेकत्र येअून करीत आहेत, हें विशेष आहे. कवि सहसा अेकत्र येत नाहींत. ही नकळत संघटणा वाढत आहे. याला चांगलें खतपाणी घालून संघटित प्रयत्नाला यश यावें व आधुनिक सर्व कवींचा काव्यसुमनहार अेकत्र सर्व रसिकांना मिळावा, म्हणजे तें अपूर्व होअील. प्रयत्न स्तुत्य असून चांगला साधला आहे.

साप्ताहिक धनुर्धारी मुंबई दि. ६–६–५९:–सहकारी तत्वांवर सहकारी प्रकाशनें काढणाऱ्या सोलापूरच्या कवित्रय मंडळाचा 'पंचमी' हा पांचवा काव्यसंग्रह आहे. यांत बारा नव्याजुन्या कवींच्या पंचेचाळीस कविता संपादित केल्या आहेत. राष्ट्रीय वृत्ति, अध्यात्म, विज्ञान, निसर्ग वगैरे विषय कवींनीं निवडले आहेत. 'झांशीची राणी', 'स्वातंत्र्यवीर सावरकर', 'पंतप्रधान लोकमान्य' यांच्यावर कांहीं कवींनी आपलीं काव्य-कुसुमें अुधळली आहेत. कांहीनी विधुरावस्थेंतीऊ वेदना व्यक्त केली आहे. कांहीनी निपुत्रिक, निर्वासित यांच्या निश्वासांना जवळ केले आहे. तर 'पुंडलीक वरदा', 'गंगास्तुति', 'भज सदा मनुजा कमलावरा', 'पांडुरंगाचा धावा' अशा कवितातून अध्यात्मवृत्ति जोपासली आहे. चंद्र हा कवींचा लाडका. पण रशियानें सोडलेला बालचंद्रहि कांही कवींच्या नजरेंतून सुटला नाही. 'माझ्या खेडयांत' व 'खेडयांतील पहाट' या कवितांतील निसर्ग वर्णन छान आहे. 'स्वामिनीस', 'स्तुत्य अुपक्रम' 'आंबटशोकी' वगैरे छोटया कविता खुसखुशीत आहेत. 'विरहिणी रामाची पादुका', 'मला वाटतें' या कवितांतील कल्पनाविलासा-बरोबरच 'बाळ पितांना', 'माझी शिल्पकला', 'घे चंद्रा अैकून'

'होतें मी बावरी', 'हात तुझें चुरेन ग' या कवितांतील भावनांचा फुलोरा रसिकांना मोहवितो. यांतील नवोदित कवींचा भविष्यकाळ अुज्वल आहे.

साप्ताहिक वनश्री नासिक दि. ४–७–५९:–गुढी पाडव्याच्या दिवशीं कवित्रय मंडळांचा 'पंचमी' हा पांचवा संग्रह प्रसिद्ध झाला असून या काव्यसंग्रहांत अुत्कृष्टपणे सुबोध मार्गदर्शन आणि नव्या पिढीला अुत्साहजनक काव्यवर्णन करून साहित्यिकांनी अनेक अडचणींतून 'पंचमी' काव्यसंग्रह सिद्ध केलेला आहे. साहित्यिक म्हटला की कंगालपुत्र. या पुत्राची बुद्धि आर्थिक दृष्टीने केविलवाणी असते. अशाहि परिस्थितींत श्री. अघोर यांनी 'पंचमी' काव्यसंग्रह प्रसिद्ध करून आपला अुत्साह ताजा ठेवलेला आहे. त्याबद्दल त्यांचें कौतुक करावें तेवढें थोडेच आहे. पंचमी काव्यसंग्रह वाचनीय असून संग्रही ठेवण्यालायक आहे.

कवित्रय मंडळाची मूळ कल्पना कवि भ. वा. अघोर यांची असून त्यानींच हे मंडळ स्थापन केलें. मंडळाची सर्व व्यवस्था तच पाहतात. काव्यांचें संपादन व काव्यसंग्रहांचें प्रकाशन तेच करतात म्हणून ते या मंडळाचे जनक, संस्थापक, व्यवस्थापक, संचालक, प्रकाशक व संपादक आहेत. तनमनधनाने त्यांनी मंडळाला वाहून घेतल्याने मंडळाचे ते आधारस्तंभ आहेत. थोडक्यांत म्हणजे मंडळाचे वरील अष्टाधिकार त्यांनी अितक्या कौशल्याने सांभाळले आहेत कीं मंडळाची आजची प्रगती व व्याप पाहिला म्हणजे सहज समजण्यासारखे आहे. मंडळाचें क्षेत्र महाराष्ट्राबाहेर सौराष्ट्र गोवा गुजराथ संयुक्त प्रांत येथपर्यंत त्यांनीं आपल्या परिश्रमानें व्यापक केले आहे. त्यांच्या परिश्रमांची व कर्तृत्वाची धन्य होय.

ी. पांडुरंग दत्तात्रय घुगरदरे
पांडुरंग आश्रम सोलापूर.

REFBK-0011266
REFBK-0011266

अनुक्रम ... वि: ...
नों: दि: ...


# ✱ वाङ्मयगंगेचा सादर स्वीकार ✱

१ श्रीमारुतीरायांचा पाळणा–डॉ. भास्कर गोविंद घाणेकर, पुणें

| | |
|---|---|
| २ चाहूल<br>३ जरंडचाच्या डोंगरावर<br>४ वंदना | कवि रंगनाथ नरहर होनप<br>अरुणप्रभा सहकारी प्रकाशन पुणें |
| ५ पोहण्याचा छंद<br>६ योगासनें (चित्रपट) | डॉ. र. कृ. गर्दे एम्.बी.बी.एस्.<br>आय्.एम्.एस्.रिटर्न, मुंबअी |
| ७ भावगीत रामायण<br>८ प्रभातशोभा | कवयित्री सौ. सावित्रीदेवी<br>निपुणगे, पाबळ |

९ रानराअी कवि श्रीकृष्णाग्रज अूर्फ डॉ. वामन अनंत निपुणगे पाबळ

१० भाववीणा कवि वसंत पवार, चेतना प्रकाशन पंढरपूर

| | |
|---|---|
| ११ प्राकृत श्रीराम गीतास्तोत्र<br>१२ प्राकृत श्रीलक्ष्मी लीलासार<br>१३ श्रीबाबाजी लीलासार<br>१४ प्राकृत श्रीरामरक्षा स्तोत्र<br>१५ श्रीमातापूर कथासार<br>१६ दैवयोग व रोगविचार | डॉ. हरिहर सिताराम<br>राजंदेकर–ज्योतिषी व पंचांग<br>कर्ते, रामदासपेठ अकोला.<br>(मध्यप्रदेश) |
| १७ भारतीय अुपनयन व समावर्तन<br>संस्कार परिचय<br>१८ योगाभ्यास<br>१९ भीरतीय विवाह संस्कार परिचय | श्री. गो. प्र. भावे मुंबअी |

२० स्वप्नलहरी–कवि निशिकांत अूर्फ दत्तात्रय कुलकर्णी धुळें

२१ गृहलक्ष्मी-सौ. शालाताअी बाळासाहेब तळवाडकर रावळगाव

२२ सांगत्यें अैका–कवयित्री.सौ. कमलाबाअी सोहनी मुंबअी

२३ राजसतीश आणि अितर कथा
२४ भाषाप्रकाश
२५ अमृतवाणी
२६ हिंदी भाषा सुबोध
२७ भाषा सोबती

श्री. गोविंद वासुदेव केळकर
शहापूर–बेळगाव

२८ मधुमालती
२९ मधुरमेवा

कवि सदानंद राम शिरोडकर
मातोंड बांबर

३० संगमधारा–कवि शे. रा. कुलकर्णी यांजकडून.

३१ भुकेरी कूजन
३२ हे राम ! (अेकांकिका)

कवि रा. गो. मोरे सोलापूर.

३३ दिवाळी भेटकार्ड
३४ नूतन वर्ष दिनदर्शिका

संपादक आरोग्यमंदिर मासिक
पनवेल, यांजकडून

३५ बकुळीचें फूल
३६ सर्वस्व (कादंबरी)

कविवर्य मामासाहेब अूर्फ
द. ब. मुद्गल सोलापूर.

याशिवाय श्री. मा. भि. हिरळीकर यांचें 'सज्जनगड' मासिक, संपादक जी. बी. माळी यांचें साप्ताहिक 'वनश्री', मुंबअीच्या देशस्थ ऋग्वेदी संस्थेचें 'समर्थ' मासिक हे अंक नियमित येतात. याशिवाय ध्रुव, लोकवार्ता, बांधव, धुरंधर या साप्ताहिकांचे अंक अधून मधून येतात. तसेंच कांही साप्ताहिकांचे व मासिकांचे अंक कारणपरत्वें येतात.

कवित्रय मंडळांतील कवींचें वाङ्मय अनेक साप्ताहिकांतून व मासिकांतून प्रसिद्ध होतें. याबद्दल संपादकांचें आम्ही आभारी असून असेंच वाढतें प्रोत्साहन आमच्या मंडळास द्यावे अशी विनंती आहे.

वरील सर्वांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोत.

अनुक्रम ...३८... वि: ...८।०५...

## कवित्रय मंडळांतील कवि

| | |
|---|---|
| १ भ. वा. अघोर | १७ वा. न. सरदेसाई |
| २ व. रा. पोतनीस | १८ विश्वासकुमार |
| ३ नारायण जगदाळे | १९ डॉ. अनंतराव सरदेसाई |
| ४ सौ. कुंता जगदाळे | २० पी. अेन्. कुलकर्णी |
| ५ म. भि. कुलकर्णी | २१ वासुदेव कुलकर्णी |
| ६ विष्णुसुत अंब्रजकर | २२ स. रा. शिरोडकर |
| ७ सौ. अुषा खेडकर | २३ बा. ना. तळवाडकर |
| ८ कमलात्मज | २४ वा. बा. भावे |
| ९ दि. अ. देशपांडे | २५ बा. सा. पाटील |
| १० श. श्री. देशपांडे | २६ बुध |
| ११ रमाकांत आर्ते | २७ क्षीरसागर |
| १२ सौ. शकुंतला दाते | २८ नाथ |
| १३ गो. वा. केळकर | २९ काशीसुत |
| १४ शे. रा. कुलकर्णी | ३० लक्ष्मीकुमार |
| १५ सौ. कमलाबाओ सोहनी | ३१ कमलराम |
| १६ ना. मा. तिडके | ३२ व्यास |

या संग्रहातील कवितांचे हक्क ज्या त्या कवीकडे.

# कवित्रय मंडळाचें प्रकाशित वाङ्मय

* प्रतिपदा
* द्वितीया
* तृतीया
* चतुर्थी
* पंचमी
* षष्ठी

ल व क र च अ ु ग व णा र

## सप्तमी

प्रकाशक :—

* भ. वा. अघोर *

कवित्रय मंडळ कार्यालय, नरसिंह दरबार
७३, गोल्डफिंच, सोलापूर.

— मुद्रक —

तुळशीदास सु. जाधव
लोकसेवा छापखाना ७३३ प. मंगळवार, सोलापूर.